# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७ / पौष १, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३)** | **कृषी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५)** | **पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७३**

---

## सोलापूर जिल्हा दूध संघाकडून शेतकऱ्यांना दुधाचा कमी दर दिल्याबाबत

**(१) * ९९६४७ श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने माहे जून, २०१७ पासून गाई आणि म्हशीच्या दुधाच्या दरात वाढ केलेली असताना सुध्दा सोलापूर जिल्हा दूध संघाने कागदोपत्री दूध दरवाढ करुन निपटारा शुल्कापोटी प्रतिलिटर रुपये ३ कपात दर्शवून दूध उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक फवणूक केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निपटारा शुल्क कपात करण्याचे थांबविण्याबरोबरच गत अडीच महिन्यांपासून निपटारा शुल्काच्या नावाखाली शेतकऱ्यांची कपात करण्यात आलेली रक्कम परत देण्यात यावी अन्यथा याबाबत आंदोलन करण्याचा इशारा दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार दूध उत्पादक शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केलेल्या सोलापूर जिल्हा दूध संघावर कारवाई करण्यासह दूध उत्पादक शेतकऱ्यांची वसूल केलेली निपटारा शुल्काची रक्कम परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) शासनाने माहे, जून २०१७ पासून दूधाचे दर वाढविल्या नंतर सुध्दा सोलापूर जिल्हा दूध संघाकडून दि.२१/६/२०१७ ते दि.१०/७/२०१७ या कालावधीत दूध उत्पादक शेतक-यांना दूधाचा कमी दर देण्यात आला.

तसेच शासनाने जाहिर केलेल्या रू.२७ इतक्या दरापेक्षा, निपटारा शुल्कापोटी प्रतिलिटर रू.३ कपात करून रू.२४ इतका दर दूध उत्पादक शेतकऱ्यांना दि.११/७/२०१७ ते दि.२१/८/२०१७ या कालावधीत देण्यात आल्याचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दूग्ध) सोलापूर यांनी दि. १६/८/२०१७ रोजी केलेल्या तपासणीचे वेळी निदर्शनास आले.

(२) दिनांक १३/९/२०१७ रोजी पंढरपूर तहसिल कार्यालय येथे प्रहार शेतकरी संघटनेने आंदोलन केले होते.

(३), (४) व (५) शासनाने जाहीर केलेल्या दूध दरापेक्षा कमी दर दूध उत्पादक शेतक-यांना दिला जात असल्याचे निदर्शनास आल्या नंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९ (३) अन्वये दि.६/७/२०१७ रोजी संघास नोटीस देण्यात आली.

तसेच दि.१७/७/२०१७ ते दि.२१/८/२०१७ या कालावधीत सोलापूर संघाने निपटारा शुल्कापोटी रू.३ कपात करून कमी दर दिला असल्याने उपरोक्त अधिनियमाच्या कलम ७८ (अ) अन्वये संघास दि.१६/८/२०१७ रोजी नोटीस देण्यात आली.

विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दूग्ध) पूणे यांनी याप्रकरणी सुनावणी घेऊन प्रकरण निर्णयास्तव दि.३१/१०/२०१७ रोजी बंद केले. मात्र त्यादरम्यान दि.२१/६/२०१७ ते दि.१०/७/२०१७ या कालावधीत कमी दर दिल्यामुळे दराच्या फरकाची रू.६,५६,९१८/- इतकी रक्कम संघाने दूध उत्पादकांना परत केली. त्याचप्रमाणे दि.२१/७/२०१७ ते दि.२१/८/२०१७ या कालावधीत निपटारा शुल्कापोटी कपात केलेली रू.१०,७४,४०७/- इतकी रक्कम सुध्दा दूध उत्पादक शेतक-यांना परत केली आणि दि.२१/८/२०१७ पासून निपटारा शुल्काची कपात करणे बंद केले आहे.

-----------------

## मुक्ताईनगर, बोदवड व अमळनेर (जि.जळगांव) तालुक्यांत पावसाअभावी शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(२) * १०२९८२ श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर, बोदवड व अमळनेर या तीनही तालुक्यांत कमी पाऊस झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असून पावसाअभावी पिके जळून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याबाबतच्या तक्रारी शेतकऱ्यांनी आयुक्त, कृषी विभाग व प्रधान सचिव, कृषी विभाग यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१७ पासून अनेकवेळा केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तीनही तालुक्यातील पिकांची आणेवारी प्रथमदर्शनी पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त दर्शविण्यात आली असली तरी प्रत्यक्षात मात्र पिके जळून गेली असल्याने आणेवारीच्या निकषांमध्ये बदल करण्याचा शासन विचार करणार आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानीबाबत पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कृषी आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयास मुक्ताईनगर, बोदवड व अमळनेर या तीनही जिल्ह्यात कमी पावसाअभावी काढायला आलेली पिके जळून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान

झाल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच प्रधान सचिव (कृषी) यांच्या कार्यालयास अशाप्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे सकृतदर्शनी आढळून आले नाही.

(२) जळगांव जिल्ह्याची सन २०१७-१८ ची सुधारीत पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. मुक्ताईनगर, बोदवड व अमळनेर या तीनही तालुक्यांची सुधारीत पैसेवारी ५० पैशांच्या आत आहे. आणेवारीच्या निकषांमध्ये बदल करण्याची बाब सद्यःस्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ व शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ मधील निकषात सदर तीन तालुके बसत नसल्यामुळे या तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे नुकसान भरपाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेठ (ता.पेठ, जि.नाशिक) येथील गौण खनिजांच्या अवैध उत्खननाबाबत

**(३) * ९५३७५ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ (ता.पेठ, जि.नाशिक) येथील गट क्रमांक २२३ व २२४ मध्ये महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने सन २००६ पासून गौण खनिजांचे अवैध उत्खनन करुन शासनाच्या ३०० कोटी रुपयांच्या महसूलाचे नुकसान केल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महसूल तसेच जिल्हा गौण खनिज अधिकारी यांच्याकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या असतानाही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त तालुक्यात गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करून महसुलाची रक्कम वसूल करण्याबाबत तसेच गौण खनिज उत्खननात सहकार्य करणाऱ्या संबधित अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाची स्थानिक वृत्तपत्रामध्ये दि.२२/७/२०१७ रोजी बातमी प्रसिध्द झाली होती.

तहसीलदार, पेठ यांनी जानेवारी, २०१७ मध्ये याबाबत केलेल्या चौकशीमध्ये मौजे पेठ येथील गट क्र.२२३ मध्ये गौणखनिजाचे उत्खनन केल्याचे आढळले नाही. मात्र, गट नं.२२४ मध्ये केलेल्या अवैध गौणखनिज उत्खननाबाबत रु.५१,१३,९७५/- इतक्या रक्कमेच्या दंडाचे आदेश तहसीलदार, पेठ यांनी दि.१/२/२०१७ रोजी पारीत केले असून दंडाच्या या रक्कमेपोटी संबंधिताच्या मालकीच्या खाजगी जमिनींच्या गाव नमुना नं.७/१२ वर बोजे चढविण्यात आले आहेत. तहसीलदार, पेठ यांचे हे आदेश सदर क्रशरचालकाने उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांचेकडे आव्हानित केले आहेत. उपविभागीय अधिकारी, दिंडोरी यांनी तहसीलदार, पेठ यांच्या आदेशास स्थगिती दिली आहे.

दि.१६/८/२०१७ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा खनिकर्म अधिकारी, नाशिक यांनी केलेल्या चौकशीत गट क्र.२२३ मध्ये दगडखाण, स्टोनक्रशर व डांबरप्लँट अस्तित्वात नसल्याचे तसेच या गटातून उत्खनन केले नसल्याचे आढळून आले. तथापि, गट नं.२२४ या सरकारी दगडखाणीतून क्रशरधारकाने माहे जानेवारी,२००६ ते मार्च, २०१६ या कालावधीत २२९४ ब्रास दगडाचे अवैध उत्खनन केल्याचे दिसून आल्याने संबंधिताविरुध्द रु.१,८२,१४,३६०/- इतका दंड आकारण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

ता.पेठ, जि.नाशिक येथे माहे एप्रिल, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या १० प्रकरणांमध्ये कारवाई करून सुमारे रू.१६,०७,०५०/- एवढा दंड वसूल करून शासनजमा केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला-वाशिम-हिंगोली या राज्यमार्गाची व पारस फाटा-बाळापूर-पातूर या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४) * ९८८२३ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील पारस फाटा ते बाळापूर व बाळापूर ते पातूर या रस्त्यांवर मोठया प्रमाणावर खड्डे पडल्यामुळे अपघात होऊन नागरिकांना जीव गमवावा लागत असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला-वाशिम-हिंगोली या मार्गावर मोठया प्रमाणात खड्डे पडले असल्यामुळे वाहने चालविणे अडचणीचे ठरून अनेकदा लहान-मोठे अपघात होऊन त्यात प्रवाशांचा मृत्यू होत असतानाही संबंधित अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे तसेच या महामार्गावर वाशिम तामशी फाटयाजवळ अंतराची चुकीची माहीती देणारा फलक सार्वजनिक बांधकाम विभागाने लावल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाळापूर व पातूर (जि.अकोला) या तालुक्यातील शासकीय इमारती मोडकळीस आल्या असून अंत्री येथील पुलाचे काम अत्यंत धीम्या गतीने सुरु असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिक यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे करूनसुद्धा याकडे विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार पारस फाटा ते बाळापूर व बाळापूर ते पातूर या रस्त्याची, अकोला-वाशिम-हिंगोली या मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत तसेच बाळापूर व पातूर (जि.अकोला) येथे नविन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत व अंत्री येथील पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच वाशिम तामशी फाटयाजवळ अंतराची चुकीची माहीती देणारा फलक लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) अकोला-वाशिम-हिंगोली रा.म.क्र.१६१ या रस्त्याच्या कि.मी.०/०० ते ९५/०० च्या लांबीतील खड्डे भरुन सदयस्थितीत वाहतुकीसाठी रस्ता सुस्थितीत आहे.

(३) अकोला जिल्ह्यातील बाळापूर व पातूर येथील शासकीय इमारती मोडकळीस आल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच अंत्री येथील पूलाचे काम विहीत वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) अ) पारस फाटा ते बाळापूर व बाळापूर ते पातूर या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले आहे.

ब) अकोला-वाशिम-हिंगोली राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१ या महामार्गावरील कि.मी.०/०० ते ९५/०० या लांबीतील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

क) बाळापूर जि.अकोला येथील नियोजित प्रशासकीय इमारत बांधकामाचे रु.१२.३० कोटी इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी, अकोला यांना दि.०३.०३.२०१५ रोजी सादर करण्यात आलेले आहे.

ड) अंत्री येथील पूलाचे काम विहीत वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

इ) वाशिम तामशी फाटयाजवळ असलेल्या माहिती फलकाबाबत अहवाल मागविण्यात आला असून त्याआधारे आवश्यक कारवाई करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहाच्या सुशोभीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(५) * १००७२३ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहाचे सुशोभीकरण करण्याच्या कामाची निविदा नियमाप्रमाणे काढणे आवश्यक

असताना ७० लक्ष रुपयांची कामे विना निविदा सुरु असून मर्जीतल्या ठेकेदारांना कामे दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथील डी.पी.सी. सभागृहाची दुरुस्ती करणे आवश्यक असताना ती न करता उक्त काम करण्यात येत असून या कामामुळे या सभागृहातील पूर्वीचे फर्निचर व सुमारे ७ लक्ष रुपयांची ध्वनी यंत्रणा निकामी झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त काम निविदा न काढता सुरु करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथील डी.पी.सी. सभागृहाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

-----------------

## मुरूम मंडळ (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील शेतकऱ्यांना सन २०१५-१६ चा रब्बी विमा मंजूर न झाल्याबाबत

**(६) * १०२४४१ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरूम मंडळ (ता.उमरगा, जि.उस्मानाबाद) येथील १७ गावांतील अंदाजे ११०९४ शेतकरी सभासदांनी २०१५-१६ रब्बी हंगामासाठी भारतीय कृषी विमा कंपनीकडे ज्वारी, हरभरा, करडी, गहू, सूर्यफूल, कांदा, भुईमूग, आदी पिकांसाठी १,३५,७२३५/- रुपये विमा भरलेला असतानाही या पिकांसाठी विमा मंजूर करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांचे अंदाजे १ कोटी ७५ लक्ष ४८ हजार ८८६ रुपये एवढे नुकसान झाले असुन सदर शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा विमा मिळणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषि मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजनेंतर्गत मुरुम महसूल मंडळ, तालुका उमरगा, जि.उस्मानाबाद येथील २१९५९ शेतकऱ्यांनी सहभाग घेऊन ज्वारी, हरभरा, करडई, गहु, सुर्यफुल, कांदा व भुईमुग या पिकांसाठी विमा संरक्षण घेतलेले होते. त्यापैकी गहु, भूईमुग, सूर्यफुल व कांदा या पिकांसाठी योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार नुकसान भरपाई देय झाली आहे. ८६११ शेतकऱ्यांना रु.८.४९ कोटी नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करुन शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करणेसाठी संबंधित बँकाकडे दि.०३.०३.२०१७, दि.१५.०३.२०१७ व दि.२७.०३.२०१७ रोजी वर्ग करण्यात आलेली आहे.

(२) लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

(३) व (४) राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत पात्र झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मंजूर करुन शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी संबंधित बँकांकडे वर्ग करण्यात आलेली असून त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सुध्दा प्राप्त झालेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहेरभायगाव ते रोहिलागड (ता.अंबड, जि.जालना) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(७) * १०३३७८ श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहेरभायगाव ते रोहिलागड (ता.अंबड, जि.जालना) या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून रस्त्यावर बांधण्यात आलेल्या पुलावरील सिमेंट निघाल्याने व स्लॅबमधील लोखंड उघडे पडल्याने या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या दुरवस्थेमुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असून या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ता वाकुळणी-माहेरभायगाव-रोहिलागड-किनगाव-चौफुली प्रजिमा-२० चा भाग आहे. या भागाची लांबी १३ किमी आहे. रस्त्यावरील वाळू वाहून नेणा-या वाहनांमुळे रस्ता व किमी २७/६०० मधील नळकांडी पूल क्षतिग्रस्त झाला आहे.

रस्त्याची आवश्यक दुरुस्तीची कामे करुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. क्षतिग्रस्त लांबीतील दुरुस्ती व नळकांडी पुलाच्या दुरुस्तीचे काम मंजुर असून ते निविदास्तरावर आहे. निविदा निश्चित होताच काम हाती घेऊन निधीच्या उपलब्धततेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(८) * १०१९०० श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील माढा व बार्शी या तालुक्यांना जोडणाऱ्या ३४ कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरवस्था होऊन रस्ता वाहतुकीस अयोग्य झाल्याने सदर रस्त्यावर अपघात घडून मृत्यु होण्याचे प्रमाण वाढले असून रस्त्याच्या दुरुस्तीसाठी प्रवाशी व नागरीकांनी आंदोलन केल्यानंतर रस्त्याच्या पुनर्बांधणीचा ११.५० लक्ष रुपयांचा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी-बार्शी, करमाळा-टेंभुर्णी, टेंभुर्णी-कुर्डूवाडी, माढा-वैराग यासह सर्वच रस्त्यांची दुरवस्था झाली असून करमाळा ते टेंभुर्णी व बार्शी ते कुर्डूवाडी या रस्त्यावरील अपघातात १०० नागरिकांचा बळी जाऊन शेकडो नागरिक जखमी झाले असल्याचे तसेच या रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी करूनही रस्त्यांची दुरुस्ती न केल्यामुळे आंदोलने करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार माढा व बार्शी या तालुक्यांना जोडणाऱ्या रस्त्याच्या पुनर्बांधणी प्रस्तावास मान्यता देण्याबाबत तसेच सोलापूर जिल्ह्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

माढा व बार्शी तालुक्यांना जोडणाऱ्या माढा-बार्शी रस्ता रा.मा.१४५ साठी रु.२३.४० लक्ष, माढा ते वैराग रा.मा.२०३ साठी रु.४० लक्ष, टेंभुर्णी ते कुर्डुवाडी-बार्शी रा.मा.१४५ साठी रु.२६३७.६२ लक्ष व टेंभुर्णी ते करमाळा प्र.रा.मा. ८ साठी रु.४०७३ लक्ष इतक्या रकमेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. काही कामे प्रगतीत असून काही कामांच्या निविदा निश्चितीची कार्यवाही प्रगतीत आहे.

सद्यस्थितीत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा बेरडीपार (काचे) (ता.तिरोडा, जि.गोंदिया) येथील शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरून तलावासाठी दिलेल्या तुकड्याची नोंद कमी करण्याबाबत

**(९) * १०३७६० श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बेरडीपार (काचे) (ता.तिरोडा, जि.गोंदिया) येथे गत १५ वर्षापूर्वी लोहझरी नावाचे ल.पा. तलाव मंजूर झाले असून या तलावाच्या बांधकामाकरिता परिसरातील शेतकऱ्यांनी जमिनीचे तुकडे दिले होते परंतु काही कारणास्तव सदर तलाव शासनाकडून रद्द करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाचे बांधकाम रद्द होवून १० वर्षाचा कालावधी झालेला असतानाही शासनाने शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील या तुकड्यांची नोंद कमी न केल्यामुळे शेतकऱ्यांना जमीन खरेदी विक्री करताना व पिक कर्ज घेताना अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरील तलावासाठी दिलेल्या तुकड्याची नोंद कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) मौजे बेरडीपाल येथे लोहझरी ल. पा. नसून बेरडीपाल तलाव प्रस्तावित आहे. सदर तलावाचे काम शासनाकडून रद्द करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) बेरडीपार (लोहझरी) ल.पा. तलावाचे काम खैरबंधा मध्यम प्रकल्पाचे आधुनिकीकरणाचे कामात अंतर्भूत आहे. बेरडीपार तलावांतर्गत समाविष्ट असलेले लाभक्षेत्र हे खैरबंधा मध्यम प्रकल्पातून भिजवले जाणार असल्याने बेरडीपार तलावाची स्वतंत्रपणे आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे सध्या बेरडीपार तलाव वगळून खैरबंधा मध्यम प्रकल्पाच्या आधुनिकीकरणाचे कामाचा पूर्णत्व अहवाल तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.

(४) बेरडीपार तलाव रद्द करण्याचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकरूड (ता.शिराळा जि.सांगली) येथील कोल्हापूर-सांगली जिल्ह्यांना जोडणाऱ्या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) * १००९७६ श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकरूड (ता.शिराळा, जि.सांगली) येथील पूल हा कोल्हापूर-सांगली जिल्ह्यांना जोडणारा महत्वाचा पूल असून या पुलावरून कोकण, कराड, गोवा इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून पुलाची दुरवस्था झाल्यामुळे वाहन चालकांना वाहने चालविणे गैरसोयीचे होत असल्याचे तसेच जीवितहानी होण्याचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२), (३) व (४) पूलाच्या बेअरिंग कोटवर पडलेले खड्डे भरण्यात आले आहेत. पूल वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आसरा-भातकुली-पठाण चौक (जि.अमरावती) या रस्त्याचे व पेढी नदीवरील पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(११) * १०३९७९ श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसरा-भातकुली-पठाण चौक (जि.अमरावती) या रस्त्याच्या ८८ कोटी रुपये किंमतीच्या कामाला मंजुरी मिळाली असून संत गाडगेबाबा यांचे चरणस्पर्शाने पावन झालेल्या ऋणमोचन या गावाला भेट देणारे लाखो भाविक या रस्त्याने प्रवास करत असल्यामुळे या रस्त्याचे तातडीने बांधकाम करण्यासाठी लोकप्रतिनिधीनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यावरील पेढी नदीवर हुडको योजनेअंतर्गत मोठया पुलाचे बांधकाम प्रस्तावित केले असून अमरावती जिल्ह्यात हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत अमरावती सर्किट हाऊस, एम.आय.डी.सी. रोड व बडनेरा रोड हे रस्तेही मंजूर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार आसरा-भातकुली-पठाण चौक या रस्त्याचे, पेढी नदीवरील पुलाचे व हायब्रीड ॲन्युईटी योजनेअंतर्गत अमरावती सर्किट हाऊस, एम.आय.डी.सी. रोड व बडनेरा रोड या रस्त्यांचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) पेढी नदीवरील पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

हायब्रीड योजनेअंतर्गत कामांच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

-----------------

## अलिबाग, मुरूड, पेण व उरण (जि.रायगड) तालुक्यांसाठी सागरी धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत

**(१२) * ९८२८३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग, मुरूड, पेण व उरण (जि.रायगड) या तालुक्यांत समुद्राच्या उधाणाच्या भरतीमुळे मातीचे बंधारे वाहून जावून शेतीत पाणी शिरल्याने शेतीचे तसेच भात पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्र किनाऱ्यावरील शेत जमिनीत समुद्राच्या पाण्यासोबत मँग्रोव्हजचे बीज वाहून आल्याने मँग्रोव्हजची वाढ झाली असून ते तोडण्यास कायदेशीर बंदी असल्याने भात शेती नष्ट होत चालली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या तालुक्यात सागरी धूपप्रतिबंधक बंधारे बांधण्यास पर्यावरण विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाले नसल्याने सदरची कामे रखडली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यातील भात शेतीचे संरक्षण करण्यासाठी धुप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत तसेच शेत जमिनीत वाढलेले मँग्रोव्हज तोडण्यास परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) होय.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/ २००४ मध्ये दिनांक ६ ऑक्टोबर, २००५ रोजी कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी कांदळवनाची तोड करण्यास प्रतिबंध केला आहे.

(३) होय.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ६ ऑक्टोबर, २००५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कांदळवनाखालील क्षेत्र वन क्षेत्र म्हणून घोषित केले आहे व त्यापासून ५० मीटर बफर झोन पर्यंत बांधकाम करण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

(४) रायगड जिल्ह्यातील ५ कामांचे महाराष्ट्र राज्य किनारपट्टी अधिनियम २०११ अंतर्गत मंजुरीसाठी प्रस्ताव जानेवारी २०१७ मध्ये महाराष्ट्र राज्य किनारपट्टी व्यवस्थापन प्राधिकरणाकडे सादर केले असता प्राधिकरणाच्या दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी झालेल्या १२० व्या बैठकीत ४ कामांची परवानगी योग्य निर्णयासाठी केंद्रिय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे शिफारस करण्यात आलेली आहे व त्याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवळा ते सौंदाणे व देवळा ते उमराणे (जि.नाशिक) या रस्त्यांसह बिल्होळ येथील फरशी पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१३) * १०३७७७ डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा ते सौंदाणे व देवळा ते उमराणे (जि.नाशिक) या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहन चालक व प्रवाशांना प्रवास करणे गैरसोयीचे होत असल्याचे तसेच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने तातडीने रस्त्याची दुरुस्ती न केल्यास रास्ता रोको करण्याचा इशारा नागरिकांनी दिला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिंपळगाव वाखारी (ता.देवळा, जि.नाशिक) जवळ असलेल्या बिल्होळ फरशी पुलावर मोठे खड्डे पडल्याने पूर्व भागातील नागरिकांची तसेच धुळे, सप्तशृंग गड व सातपुडा येथे प्रवास करणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार देवळा ते सौंदाणे व देवळा ते उमराणे या रस्त्यांची व पिंपळगाव वाखारी जवळील बिल्होळ फरशी पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

तथापि, प्रश्नाधीन रस्त्याच्या लांबीतील खडडे भरण्यात आले असून सद्यस्थितीत वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

प्रश्नाधीन पूलाचे काम पावसाळयापूर्वी पूर्ण करण्यात आले असून पूलावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भातगांव-करजुवे-तिसंग (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) खाडीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(१४) * १०२०५८ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातगांव-करजुवे-तिसंग (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) खाडीवर पुलाची अत्यंत आवश्यकता असून सदर पुलामुळे विद्यार्थी व नागरिकांचे प्रवासाचे अंतर कमी होणार असल्याने उक्त खाडीवर पूल बांधण्याबाबत नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या खाडीवर पूल बांधण्यास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) मागणीकृत पूलाचे ठिकाण योजनाबाह्य रस्त्यावरील असून योजनाबाह्य रस्त्यावरील काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषात बसत नाही.

-----------------

## महाड-पंढरपूर मार्गावरील भोलावडे-महुडे व महाड-पंढरपूर या टप्प्यातील रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) * ९७९४१ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड-पंढरपूर मार्गावरील भोलावडे-महुडे (ता.भोर, जि.पुणे) येथील रस्ता झाडा-झुडपांनी व गवताने वेढला असल्यामुळे वाहन चालकांना वाहने चालविणे अडचणीचे ठरून अपघात होण्याचा धोका निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त मार्गावर भोर (जि.पुणे) तालुक्यात ठिकठिकाणी पडलेले मोठे खड्डे, अनेक ठिकाणी अरुंद असलेला रस्ता, साइडपट्टयांची झालेली दुरवस्था तसेच पुलांना वळणावर नसलेले संरक्षक कठडे यामुळे या रस्त्यावर दररोज अपघात होत असल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार महाड-पंढरपूर मार्गावरील भोर तालुक्यातील भोलावडे-महुडे व महाड-पंढरपूर या टप्प्यातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्नांकित रस्ता महाड-लोणंद पंढरपूर प्र.रा.मा. १५ चा भाग आहे. भोर तालुक्यातील रस्त्याची लांबी ५१.१८० कि.मी. आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबरमिश्रित खडीने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

या रस्त्यावर रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघात झाल्याची नोंद पोलीस दप्तरी दिसून येत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शेलुबाजार पिंप्री अवगण (जि.वाशिम) येथे औषधाअभावी जनावरांचा मृत्यू झाल्याबाबत

**(१६) * १००२७२ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शेलुबाजार पिंप्री अवगण (जि.वाशिम) येथे औषधाअभावी १५ दिवसात २० पेक्षा अधिक जनावरांचा मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार जनावरांचा आजार नियंत्रणात आणण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने औषधसाठा वेळेवर उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच औषधाचा पुरवठा करण्याकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नसुन दि. १४.८.२०१७ ते २२.८.२०१७ या कालावधीमध्ये ४१ जनावरांना फऱ्या सदृश रोगाची लागण होऊन त्यापैकी ७ जनावरे मृत झालेली आहेत.
(२) होय.

(३) व (४) जनावरांचा आजार नियंत्रणात आणण्यासाठी सर्व ४१ आजारी जनावरांवर आवश्यक तो औषधोपचार करण्यात आलेला आहे. १९९० जनावरांना फऱ्या रोगप्रतिबंधक व ५०० जनावरांना घटसर्प रोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात आलेले आहे. उपचारासाठी आवश्यक औषधसाठा व लससाठा उपलब्ध असल्याने अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोताळा-नांदुरा (जि.बुलढाणा) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) * ९६०४७ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा-नांदुरा (जि.बुलढाणा) या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे अपघाताच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाल्याबाबतची तक्रार दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास संबंधिताकडे करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता वाहतुकीस अयोग्य झाल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मोताळा-नांदुरा या रस्त्यासाठी निधीची तरतूद करून तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि प्रश्नांकित रस्त्याच्या सुधारणेच्या कामास मंजुरी प्राप्त असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात कृषी विभागामार्फत अनुदानावर राबविण्यात येत असलेल्या योजनेत झालेला गैरव्यवहार

**(१८) * १०३३७७ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी अनुदानावर डिजेल इंजिंन, इलेक्ट्रीक मोटर, स्प्रिंकलर सेट, पिवीसी पाईप पुरवणे अशी योजना राबविल्या जात असुन शेतक-यांकडून मिळालेली १० टक्के रक्कम पुरवठादार महामंडळाकडे भरण्यात येते, परंतु जिल्हयातील काही कृषी सहायकाने शेतकऱ्याकडून मिळालेली १० टक्के रक्कम महामंडळामध्ये न भरता परस्पर हडप केली असल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्हयामध्ये ५२ कृषी सहायकाकडे २९ लाखाची रक्कम थकीत असल्याने त्या भागातील शेतक-यांना अनुदानावर देण्यात येणारे साहीत्य मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना अनुदानावर देण्यात येणारे साहित्य मिळण्याबाबत तसेच गैरव्यावहार करणाऱ्या कृषी सहायकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) व (३) संबंधित शेतकऱ्यांना अनुदानावर देण्यात येणाऱ्या साहित्याचा पुरवठा करण्यात आला आहे तथापि, शेतकऱ्यांनी स्व: हिस्स्याची दिलेली रक्कम कृषी सहायकांनी कृषी विभागाच्या कार्यालयास जमा केली नसल्याने सदर रक्कम महामंडळास जमा करण्यात आलेली नाही.

(४) संबंधित कृषी सहायकांविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१९) * १०१५६३ श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील शेतकरी दरवर्षी मोठ्या प्रमाणात संत्र्याचे उत्पादन घेत असून सन २०१६-१७ या वर्षामधील उच्च तापमान व पडलेल्या कमी पावसामुळे संत्र्याच्या झाडांना विशिष्ट कालावधीत येणाऱ्या आंबिया बहाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन झाडांची फळधारण क्षमता कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वर्षात संत्रा पिकावर फळ माशींचा प्रादुर्भाव झाला असून या फळ माशींच्या प्रादुर्भावाने लागलेल्या फळांची गळण होऊन उत्पादन खर्च सुद्धा निघाला नसल्याचे व त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अमरावती जिल्हयातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना उक्त नुकसानासाठी आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) होय.

जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि. ८.१२.२०१७ रोजी महसूल व वन विभागाकडे अहवाल पाठविला असून पुढिल कार्यवाही महसूल व वन विभाग (मदत व पुर्नवसन) यांचेकडे चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भात निकृष्ट दर्जाचे व तननाशकाला सहनशील असलेले कपाशीचे (एच.टी) बियाणे विकल्याबाबत

**(२०) * ९७०४९ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील अनेक शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे व तननाशकाला सहनशील असलेले कपाशीचे (एच.टी.) बियाणे विकण्यात आल्याची बाब साऊथ आशिया बायोटेक्नॉलाजी सेंटरच्या अहवालात नमूद करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी संशोधन परिषद व कापूस संशोधन परिषदेच्या दुर्लक्षामुळे निकृष्ट दर्जाचे बियाणे विकण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बियाणे पेरणी झालेल्या परिसरातील नागरिकांना कॅन्सर, किडणी आजार होत असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार निकृष्ट दर्जाचे बियाणे विकणाऱ्यांवर कारवाई करुन नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) विदर्भातील अनेक शेतकऱ्यांना मान्यता नसलेले व तणनाशकाला सहनशील असलेले (H.T.) अवैध कापूस बियाणे विकण्यात आल्याची बाब, साउथ आशिया टेक्नॉलॉजी या सेंटरने, केंद्र शासनाच्या जनुकीय अभियांत्रिकी मुल्यमापन समिती (GEAC) या पर्यावरण मंत्रालयाच्या अखत्यारीतील समितीला पाठविलेल्या पत्रात नमूद केलेले आहे, हे खरे आहे.

(२) केंद्रीय कापूस संशोधन संस्था (CICR), नागपूर व भारतीय कृषि संशोधन परिषद (ICAR), नवी दिल्ली या दोन्ही केंद्र शासनाच्या संस्था आहेत.

तणनाशकास सहनशील असलेल्या व मान्यता नसलेल्या अवैध कापूस बियाणांच्या विक्रीची केंद्र शासनाने दखल घेतलेली आहे. त्यानुषंगाने केंद्रशासन स्तरावरती क्षेत्रिय निरीक्षण व शास्त्रीय मुल्यमापन समिती (FISEC) स्थापन करण्यात आलेली आहे, या संदर्भात केंद्र शासनाच्या स्तरावर चौकशी सुरू आहे.

(३) तणनाशकातील ग्लायफोसेट या घटकामुळे कॅन्सरचा धोका उद्भवू शकतो असे जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय कर्करोग संशोधन संस्था (IARC) च्या अहवालात नमूद आहे.

(४) व (५) केंद्र शासनाच्या अखत्यारीतील जेनेटीक इंजिनियरिंग ॲप्रेझल कमिटी (GEAC) ने मान्यता न दिलेले तणनाशकाला सहनशील असणारे (Herbicide Tolerant) Transgenic Gene वापरून अवैधरीत्या कापूस बियाणांची विक्री महाराष्ट्रासहीत गुजरात, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यात होत असल्याने या संदर्भात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागामार्फत (C.B.I.) चौकशी करण्याची विनंती केंद्र शासनास करण्यात आलेली आहे. तसेच, सदर बियाणांची अवैधरीत्या विक्री करणाऱ्या कंपन्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सन २०१६ मधील खरीप हंगामात पीकविमा न भरलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणेबाबत

**(२१) * ९६६८२ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६ मधील खरीप हंगामात ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला नाही अशा शेतकऱ्यांना पीकविमा रकमेच्या ५० टक्के रक्कम देण्याचे शासनाने जाहिर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यातील केवळ कापूस उत्पादक शेतकरी व विदर्भातील कडधान्य, सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सदर ५० टक्के रक्कम देण्याचा शासन निर्णय काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णय काढून देखील अद्यापपर्यंत मराठवाड्यातील शेतकऱ्यांना उक्त रक्कम मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीअंती विदर्भातील व मराठवाडयातील शेतकऱ्यांना कापूस, सोयाबीन व कडधान्याच्या पिकांसाठी नुकसान भरपाई म्हणून पीक विम्याच्या ५० टक्के रक्कम देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) खरीप २०१६ हंगामातील पिकांची अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या राज्यातील ६४७ गावांतील पीकविमा काढलेला नाही अशा शेतकऱ्यांना पीकविमा नुकसान भरपाईच्या ५० टक्के रक्कम देण्याबाबत शासन निर्णय दि.१० फेब्रुवारी, २०१७ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) दि.१० फेब्रुवारी, २०१७ च्या शासन निर्णयामध्ये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांमध्ये मराठवाड्यातील एकाही गावाचा समावेश नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या ६४७ गावांमधील शेतकऱ्यांना मदत वाटपाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदस वाठोडा (ता.वरुड, जि.अमरावती) लघु प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्याबाबत

**(२२) * १०३०२४ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदस वाठोडा (ता.वरुड, जि.अमरावती) लघु प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे दिनांक ८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्यत्र शेतकऱ्यांच्या जमिनीसाठी देण्यात आलेल्या मोबदल्यापैकी चारपट कमी मोबदला येथील शेतक-यांना देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

चांदस वाठोडा (ता.वरूड, जि.अमरावती) ह्या लघु प्रकल्पासाठी कार्यकारी अभियंता, प्रकल्प बांधकाम विभाग, अमरावती यांचेमार्फत मौजे मुसळखेडा, दाभी, केकतवाडा, भांडोली, सुर्यखेडा, कुंभीखेडा, मौजा/धनोडी, मालखेड येथील सुमारे एकूण ३१२.७६ हे.आर. खाजगी जमीन सरळ खरेदीद्वारे सन-२००८ ते २०११ दरम्यान घेण्यात आलेल्या आहेत. सहायक संचालक, नगररचना, अमरावती यांनी उक्त नमूद जमिनीचे दर निश्चित केल्याप्रमाणे तसेच बाधित विहीर, फळझाडे व इतर बाबींचे मूल्यांकन केल्याप्रमाणे संबंधित जमिनीचा मोबदला अदा करण्यात आलेला आहे.

तसेच उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, मोर्शी यांनी संबंधित प्रकल्पामधील तीन भूसंपादन प्रकरणांमध्ये एकूण ४.७९ हे.आर. जमीन नवीन भूसंपादन कायदा, २०१३ च्या तरतूदीनुसार संपादित करण्यात आलेली आहे.

नवीन भूसंपादन कायदा,२०१३ हा दि.१.१.२०१४ पासून संपादित होणा-या जमिनींना लागू असून प्रस्तुत प्रकल्पासाठी खाजगी जमिनी ह्या सरळ खरेदीद्वारे सन-२००८ ते २०११ दरम्यान घेण्यात आलेल्या असल्याने त्यांना सदर कायद्यानुसार मोबदला अनुज्ञेय ठरत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेने शेतकऱ्यांसाठी खरेदी केलेली नांगरणी यंत्रे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(२३) * ९६६२२ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विभाग, जिल्हा परिषद नागपूरने शेतकऱ्यांसाठी खरेदी केलेल्या ४१७ नांगरणी यंत्रात मोठया प्रमाणात अनियमितता आढळून आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र कृषी विकास महामंडळाकडून शेतकऱ्यांसाठी खरेदी करण्यात आलेली नांगरणी यंत्रे निकृष्ट दर्जाची असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व कृषी अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र कृषी विकास महामंडळाकडून नांगरणी यंत्रे खरेदी करतांना निष्काळजीपणा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हे खरे नाही.

नांगरणी यंत्रात अनियमितता असल्याचे आढळून आले नाही. तथापि, महाराष्ट्र कृषी विकास महामंडळाकडून पुरवठा करण्यात आलेल्या कल्टीव्हेटर्सच्या गुणवत्तेबाबत तक्रारी आल्या होत्या.

(३) व (४) उक्त प्रकरणी जिल्हा परिषद स्तरावर त्रिस्तरीय समिती नेमुन चौकशी करण्यात आली आहे. चौकशी समितीच्या शिफारशीनुसार तत्कालिन कृषी विकास अधिकारी यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक ८ नुसार कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रहिमतपूर (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील सेवानिवृत्त सुभेदाराला मंजूर शासकीय जमिनीचा ताबा न दिल्याबाबत

**(२४) * ९८९६३ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रहिमतपूर (ता.कोरेगांव, जि.सातारा) येथील सेवानिवृत्त सुभेदार सी.एम. जंगम यांना सन १९६५ च्या भारत-पाकिस्तान युध्दामध्ये विशेष कामगिरी केल्याबद्दल दिनांक १२ ऑगस्ट, १९६८ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन जिल्हाधिकारी, सातारा यांनी सातारा शहरातील रविवार पेठ, सि. स.क्र.१६६/अ-१ ही नगरकक्षेतील शासकीय जमीन मंजूर केली होती असून त्यासाठी त्यांनी आवश्यक असणारे रू.३,६४७/- चे चलान शासकीय कोषागारात दिनांक ११ ऑक्टोबर, १९६८ रोजी भरले असतांना सुद्धा त्यांना सदर जमिनीचा ताबा अद्याप मिळाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीची मुल्यांकन रक्कम श्री.जंगम यांनी शासकीय कोषागारात भरली असल्याबाबतचे पत्र नगर भूमापन कार्यालयाने देऊनही तत्कालीन जिल्हाधिकारी, सातारा यांनी दिनांक ०५ मे, १९७२ चे कब्जे पट्टीनुसार मुळ जमीनीपैकी १५२५ चौ. फुट जमीन श्रीमती बल्लाळ यांना देण्यात आल्याचे व उर्वरीत जमीनीवर पुन्हा सन १९९७ साली आरक्षण टाकून तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या दिनांक ०२ एप्रिल, २००८ च्या आदेशान्वये नगर परिषद, सातारा यांना व्यापारी संकुल बांधण्याच्या प्रयोजनास्तव हस्तांतरीत केल्याबाबतची माहिती माहितीच्या अधिकारात श्री.जंगम यांना नगर भूमापन कार्यालयाकडून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन जिल्हाधिकारी, सातारा यांनी सदरच्या जागेचा ताबा न देता सदरचे प्रकरण सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जागेबाबत शासनाची भुमिका काय आहे व सदर आरक्षणाला नगर विकास विभागाने मंजूरी दिली असल्यास सदर जमिन किंवा अन्य शासकीय जमीन श्री.जंगम यांना देण्याबाबत व माजी सैनिकास न्यायापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) श्री. सी.एम.जंगम मागणी करीत असलेल्या उक्त जागेचा मूळ नस्तीसोबतचे रेकॉर्ड सुमारे ५० वर्षे जुन्या कालावधीचे असल्याने जिल्हाधिकारी, सातारा कार्यालयात आढळून येत नाही. तसेच रक्कम रु.३६४७/- कोषागारात भरल्याच्या चलनाबाबत श्री.जंगम यांनी सादर केलेल्या प्रतीवरुन केलेल्या चौकशीमध्ये चलनाचे अभिलेख फार जुने असल्यामुळे व मूळ प्रत बँकेकडे उपलब्ध नसल्यामुळे त्याची सत्यता पडताळणी करणे शक्य झाले नाही. तथापि, मागणी केलेल्या भूखंडासंदर्भात जिल्हाधिकारी, सातारा तसेच नगर भूमापन अधिकारी, सातारा यांच्याकडे श्री.जंगम यांनी दाखल केलेल्या काही कागदपत्रांवरुन नगर भूमापन क्र.१६६अ/१ या भूखंडातील प्लॉट त्यांना देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी, सातारा तसेच नगर भूमापन अधिकारी, सातारा यांचेकडून कार्यवाही चालू होती असे सकृतदर्शनी दिसते.

(२) श्री.जंगम यांनी नगर भूमापन अधिकारी, सातारा यांना माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी, नगर भूमापन कार्यालय, सातारा यांनी दि.३१.७.२०१५ च्या पत्रान्वये त्यांचेकडील अभिलेखात सि.स.नं.१६६अ/१ या मिळकतीची, मिळकत पत्रिकेवरुन पडताळणी केली असता सि.स.नं.१६६अ/१ प्लॉट नं.१ याप्रमाणे अभिलेख उपलब्ध नसल्याने, तसेच त्यामध्ये दुरुस्ती झाली असल्याने दुरुस्ती प्रमाणे उपलब्ध अभिलेख श्री.जंगम यांना उपलब्ध करुन दिले आहेत.

(३) श्री. जंगम यांचे प्रकरणी न्यायपूर्ण कार्यवाही होण्यासाठी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार श्री. जंगम यांना अन्य सुयोग्य भूखंड देण्यासंदर्भात श्री.जंगम यांच्या अर्जावरुन कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. याबाबतचा अंतिम प्रस्ताव शासनास अद्यापि प्राप्त झाला नाही.

(४) व (५) श्री. जंगम यांनी दि.१७.११.२०१७ रोजी जिल्हाधिकारी, सातारा यांना केलेल्या अर्जान्वये सदर बाजार सातारा किंवा रविवार पेठ सातारा येथील भूखंडांची मागणी केली असून त्यांच्या नवीन भूखंड मागणीच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयामार्फत तपासणी सुरु असल्याने संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पेढी (ता.भातकुली, जि.अमरावती) प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबत

**(२५) * १०२९१९ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेढी (ता.भातकुली, जि.अमरावती) प्रकल्पासाठी सन २००७-०८ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या शेतजमिनी शासनाने अत्यल्प भावाने खरेदी केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनींची सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार वाढीव दराने तफावतीची रक्कम प्रकल्पग्रस्तांना देण्याबाबतची तसेच या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या शेतकरी व शेतमजुरांना देण्यात आलेल्या जमिनी भोगवटदार वर्ग-२ मधून वर्ग-१ करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मदत व पुर्नवसन मंत्री यांचेकडे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबत तसेच त्यांच्या जमिनी भोगवटदार वर्ग-१ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) निम्न पेढी प्रकल्पासाठी सन २००७-०८ मध्ये ९९३ हे.आर जमीन शासन निर्णय महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई क्र.एलक्युएन १८/२००४/प्रक्र.१६२/अ-२, दि.६.६.२००६ मधील सरळ खरेदी पध्दतीने जमीन संपादित करण्याबाबतचे निर्देशानुसार व नगर रचना विभाग यांनी केलेल्या मूल्यांकनानुसार शेतकऱ्यांच्या सहमतीने कार्यकारी अभियंता, अमरावती प्रकल्प बांधकाम विभाग, अमरावती यांचेकडून खरेदी करून संपादित करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) निम्न पेढी प्रकल्पासाठी उक्त ९९३ हे.आर जमीन सन २०१३ चा भूसंपादन कायदा लागू होण्याअगोदर सरळ खरेदी पद्धतीने घेतली. त्यामुळे वाढीव मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या शेतकरी व शेतमजुरांना देण्यात आलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-२ म्हणून निवासी प्रयोजनासाठी देण्यात आल्या आहेत व पुढील १० वर्षानंतर त्याचा भोगवटादार वर्ग १ मध्ये समावेश करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हयातील बलगाव ते वायगाव, मार्की ते निरुळ व गंगामाई ते पुर्णानगर या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२६) * ९९८९० ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती-परतवाडा (जि.अमरावती) मार्गावरील बलगाव ते वायगाव, मार्की ते निरुळ व गंगामाई ते पुर्णानगर या रस्त्यांवर मोठया प्रमाणात खडडे पडून रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून या अपघातात धारणी येथील एका पोलीसाचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार बलगाव ते वायगाव, मार्की ते निरुळ व गंगामाई ते पुर्णानगर या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित रस्त्यांवर काही प्रमाणात खड्डे पडले होते. तथापि सद्य:स्थितीत खड्डे भरण्याचे काम प्रगतीत आहे.

(२) नाही.

तथापि दोन दुचाकी समोरा समोर धडक मारून अपघात झाल्याने पोलीसाचा मृत्यु झाल्याचे पोलीस पंचनाम्यात नमुद आहे. रस्त्याच्या दुरावस्थेमूळे अपघात झाल्याची बाब नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साई-नागझरी बॅरेजची क्षमता वाढविण्याच्या व मांजरा नदी खोलिकरण करण्याच्या कामाबाबत

**(२७) * ९५१०० श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साई-नागझरी बॅरेजची क्षमता वाढविण्याच्या व मांजरा नदी ५ कि.मी. खोलीकरण करण्याच्या कामासाठी मुख्यमंत्री सहायता निधी-२०१३ (दुष्काळ), मंत्रालय या विभागातून रुपये ३ कोटी रुपयांचा निधी दिनांक ३ मे, २०१६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीतील रुपये ३ कोटींची कामे ई निविदेमार्फत करण्यात आली आहेत काय,

(३) असल्यास, उक्त निधी शासनाची पूर्व मंजूरी न घेता इतर कामांसाठी वळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार अनियमितता करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदरील निधी लातुर शहरास पाणी पुरवठा करणाऱ्या साई-नागझरी बंधाऱ्याची क्षमता वाढविण्यासाठी व कारसा-पोहरेगांव ते टाकळी पुल या क्षेत्रात मांजरा नदीचे पात्र खोलीकरण व रुंदीकरण यासाठी खर्च करण्यात आला आहे.

(४) मांजरा खोलीकरणावरील निधी इतर कामासाठी वळवला नसल्यामुळे चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि, यासंदर्भात प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने विभागीय स्तरावरील चौकशी पथकामार्फत चौकशीची कार्यवाही अंतिम टप्यात आहे.

(५) विभागीय चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होताच त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०१५-१६ च्या पिक विम्याची रक्कम न मिळाल्याबाबत

**(२८) * १०२०७२ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये पिक विमा योजनेच्या अमरावती, नागपुर, औरंगाबाद, लातुर, नाशिक, पुणे व कोल्हापुर विभागासाठी भारतीय कृषी विमा कपंनीकडून एकत्रित नुकसान भरपाईची ८९३.८३ कोटी रूपयांची रक्कम बँकांकडे जमा करण्यात आली असुन संबंधीत बँकाकडून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रक्कम जमा केली असल्याचे सांगण्यात आले, परंतु प्रत्यक्षात बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील शेतक-यांच्या खात्यात रक्कम जमा झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) रब्बी हंगाम २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत बुलडाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील ६५१६ शेतकऱ्यांनी ५४०० हेक्टर क्षेत्रास विमा संरक्षण घेतले होते. योजनेच्या मार्गदर्शक

सुचनांनुसार यापैकी गहु (बागायती) हे पिक घेतलेल्या २०९८ शेतकऱ्यांना रु.३१.९७ लाख नुकसान भरपाई भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत निश्चित करण्यात आली असून संबंधित बँकेमार्फत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वितरीत करण्यात आलेली आहे.

(२) व (३) संबंधित बँकेने ज्यांच्याकडे विमा रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली आहे त्यांचे नाव, रक्कम व प्राप्त झालेले उपयोगिता प्रमाणपत्राची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बँक | नुकसान भरपाई रक्कम (रु.लाख) | शेतकरी संख्या | उपयोगिता प्रमाणपत्राची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ इंडिया- नागपूर | २.२८ | १२३ | प्राप्त |
| २ | बँक ऑफ महाराष्ट्र, बुलढाणा | २.३८ | १६४ | प्राप्त |
| ३ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बुलढाणा | ६.०१ | ३२४ | प्राप्त |
| ४ | एचडीएफसी बँक लि.मुंबई | ०.०९ | ४ | प्राप्त |
| ५ | आयसीआयसीआय, मुंबई | ०.८२ | ११ | प्राप्त |
| ६ | इंडियन ओवरसीज बँक, नागपूर | २.३२ | १४६ | प्राप्त |
| ७ | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, चिखली, बुलढाणा | १.७४ | १०१ | प्राप्त |
| ८ | स्टेट बँक ऑफ इंडिया, बुलढाणा | १३.३७ | १०६७ | प्राप्त |
| ९ | विदर्भ कोंकण ग्रामीण बँक, अकोला | २.९६ | १५८ | प्राप्त |
| | **एकुण** | **३१.९७** | **२०९८** | |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मौजे शिरगांव व सातपाटी (ता.जि.पालघर) येथील जमिनीवर अवैधरीत्या प्लॉट पाडल्याबाबत

**(२९) * १०२८६८ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरगांव व सातपाटी (ता.जि.पालघर) या ग्रामपंचायत हद्दीतील समुद्र किना-यालगत असलेल्या गट क्र. ४२४ व ५३९ मधील ४० एकर शेत जमिनीची तालुका भुमी अभिलेख कार्यालयामार्फत निश्चिती न करता (टीएलआर सर्वे) व जमिन अकृषक (एन.ए) न करता विकासकाने प्लॉट पाडून त्यांची विक्री केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीवर ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगीने न घेता अनधिकृत बांधकाम केले असून जमीनीचे मुळ मालक परदेशात असताना परराष्ट्र मंत्रालयाची कोणतीही परवानगी न घेता खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यात आल्याने या प्रकरणात नियम, अटी व शर्तीचा भंग झाल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायतीकडून करण्यात आल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त जमीन अवैधरीत्या प्लॉट पाडून विक्री करणाऱ्यांवर व त्यास मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे शिरगांव (सातपाटी) (ता.जि.पालघर) येथील ग.नं. ४२४ व ५३९ या जमिनीची भूमि अभिलेख विभागामार्फत निश्चिती न करता तसेच बिगरशेती न करता भूखंड विक्री करीत असल्याबाबतची तक्रार सरपंच, ग्रामपंचायत, सातपाटी यांनी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे, तसेच एका पंचायत समिती सदस्य यांनी मा.मंत्री (आदिवासी विकास) तथा मा.पालकमंत्री पालघर जिल्हा यांच्याकडे केली आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याचे जिल्हाधिकारी, पालघर यांना निर्देश देण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## मौजा वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथील जमिनीच्या गैरव्यवहाराबाबत

**(३०) * १०१७७९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथील स.नं.३५ मधील १ हे.७६.५ आर जमीन शासनाने रामनगर सहकारी गृहरचना संस्थेस महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र.जमीन/एस-३०/जमीन ३४९३/ प्र.क्र.पु.९३३/भाग-३/ज-५, दि.०७/०७/२००८ नुसार आदेश क्र.पमह/सीआर/१२६/२००९, दि.२७/१०/२००९ अन्वये त्यांच्या २१८ सभासदांसाठी विनामुल्य कब्जेहक्काने अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रदान केली असून या व्यवहारात गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या अटीप्रमाणे जमीन सहकारी संस्थेच्या ताब्यात दिल्यापासून ६ महिन्यांच्या आत २१८ सभासदांची पात्र यादी जिल्हाधिकारी यांस सादर करणे आवश्यक असताना गेल्या ९ वर्षापासून रामनगर सहकारी गृहरचना संस्थेच्या २१८ पात्र सभासदांची यादी जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाकडे सादर झालेली नसल्याचे तसेच सदरहू जमीन खाजगी विकासकास हस्तांतर करता येत नससतांनाही उक्त संस्थेच्या अध्यक्षांनी सभासदांना विचारात न घेता व शासनाची परवानगी न घेता सारथी ग्रुपचे विकासक यांना जमिन विकसीत करण्यास दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीर हस्तांतरण केलेल्या या जमिनीवर विकासकाने वित्तीय संस्थांकडून २० कोटी रुपयांचे कर्ज घेऊन ३९६ सदनिका बांधल्याचे व जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या परवानगीविना विक्री केल्याचे व यावर जिल्हाधिकारी कार्यालयाने अद्यापी कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार उक्त जमीन शासनाच्या ताब्यात घेऊन रामनगर सहकारी गृहरचना संस्थेचे अध्यक्ष व संबंधित विकासक यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) रामनगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित या संस्थेस मौ. वारजे ता. हवेली जि. पुणे येथील सर्व्हे नं.३५ मधील १ हेक्टर ७६.५ आर इतकी जमीन सदर संस्थेच्या सभासदांच्या गृहबांधणीसाठी विनामुल्य कब्जे हक्काने दि.०७.०७.२००८ च्या ज्ञापनाने प्रदान केली असून जमीन मंजूर करण्याच्या व्यवहारात गैरव्यवहार झालेला नाही. मात्र जमीन प्रदान केल्यानंतर शासनाने तसेच जिल्हाधिकारी, पुणे यांनी घातलेल्या अटी व शर्तीचा संस्थेच्या अध्यक्षांकडून भंग झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३), (४) व (५) संस्थेच्या सभासदांच्या गृहबांधणीसाठी निधी उभारता यावा यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि.१०.०८.२०११ रोजीच्या आदेशानुसार तारणशुल्क वसूल करून कर्ज उभारण्यास मंजूरी दिली आहे व संस्थेने ३ गृहसंकुलामध्ये ३९६ सदनिकांचे बांधकाम केल्याचे दिसते. तथापि, संस्थेने समाजकल्याण विभागाकडून शिफारस करण्यात आलेल्या सभासद यादीस जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून जमिनीचा ताबा घेतल्यापासून ६ महिन्याच्या आत सभासद यादीस मंजूरी घेतलेली नाही. तसेच संस्थेने विकासकांशी विना परवाना विकसन करारनामा व कुलमुखत्यारपत्र करून सदनिकांची विक्री केली असल्याने संस्थेने जमीन प्रदान आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यांचेकडील आदेश दि.२०.०६.२०१७ अन्वये संस्थेस प्रदान केलेले उक्त क्षेत्र सरकार जमा करण्याचे आदेश पारित केले आहेत. या आदेशास संस्थेने अप्पर आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या न्यायालयात आव्हान दिले असून सद्य:स्थितीत अप्पर आयुक्त, पुणे यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्या आदेशास स्थगिती दिलेली आहे. सदर प्रकरणी अंतिम निर्णय प्रलंबित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील शेतकऱ्यांचे ठिबक सिंचन संचाचे अनुदान प्रलंबीत असल्याबाबत

**(३१) * १०१४१९ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यातील सन ५२९ शेतकऱ्यांनी २०१४-२०१५ मध्ये १ कोटी ३५ लक्ष ४७ हजार रुपयांचे ठिबक सिंचन संच अनुदानाचे प्रस्ताव शासनाकडे दाखल केले असुन त्यातील ३९ लक्ष ४७ हजार रुपये शेतकऱ्यांना प्राप्त झाले आहेत, सन २०१५-२०१६ मध्ये ६६४ शेतकऱ्यांचे १ कोटी ७४ लाख रुपयांचे प्रस्ताव शासनाकडे सादर असुन त्यापैकी १५ लक्ष २० हजार रुपये अनुदान शेतकऱ्यांना वितरीत केले असुन अद्यापही दोन वर्षापासून २ कोटी ५३ लाखांची अनुदान रक्कम प्रलंबीत असल्याचे दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार चांदुर रेल्वे तालुक्यातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचन संचाचे अनुदान त्वरित मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत प्राथम्यक्रमानुसार शेतकऱ्यांना पूर्वसंमती देण्यात येते. पूर्वसंमती मिळाल्यानंतर सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी केलेल्या शेतकऱ्यांनाच अनुदान देण्यात येते. त्यानुसार चांदुर रेल्वे (जि.अमरावती) तालुक्यासाठी सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षामध्ये उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत पूर्वसंमती प्राप्त सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या अनुक्रमे १५८ व ५२ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम अनुक्रमे रु.३९.५३ लक्ष व रु.१५.१९ लाख जमा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आमगाव (जि.गोंदिया) येथील धोकादायक रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(३२) * १०३६४३ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगाव (ता.आमगाव, जि.गोंदिया) येथे माहे जुलै-ऑगस्ट, २०१७ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे रस्त्यावर मोठे खड्डे पडून व डांबरी पृष्ठभाग उखडून रस्त्यांची दुरवस्था झाल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आमगाव येथील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबतचे निवेदन आमगाव येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, यांना दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार आमगाव येथील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि आमगाव जि.गोंदिया येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्याच्या लांबीपैकी काही लांबीत रस्ते क्षतिग्रस्त झाले होते.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) आमगाव जि.गोंदिया येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबरमिश्रित खडीने भरण्याचे काम प्रगतीपथावर असून डिसेंबर २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सद्य:स्थितीत रस्ते वहातूकीस सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

-----------------

## माणगाव (जि.रायगड) तालुक्यात मुंबई-गोवा महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदला वाटपात झालेला गैरव्यवहार

**(३३) * ९६२४६ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव (जि.रायगड) तालुक्यात मुंबई - गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीच्या सातबाऱ्यावरुन प्रकल्पग्रस्तांची नावे काढून व त्याजागी दुसरी नावे टाकून मुळ शेतकऱ्यांना मोबदला नाकारण्यात येत असल्याचे तसेच मूळ शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरुन त्या शेतकऱ्यांची नावे नष्ट करून गैरव्यवहार करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला लवकर पाहिजे असल्यास प्रांताधिकारी यांना ५ टक्के तर दलालांना १ टक्का कमिशन द्यावे लागत असल्याने त्याबाबतची तक्रार प्रकल्पग्रस्तांनी मा.मुख्यमंत्री तसेच प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना केली असून वसंतराव चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षांनी सुद्धा या मोबदला वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत मा.मुख्यमंत्री, यांच्याकडे निवेदन दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार प्रकल्पग्रस्तांची नावे काढून त्यांच्या जागी दुसरी नावे टाकणाऱ्या व मूळ शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावरुन त्या शेतकऱ्यांची नावे नष्ट करणाऱ्या तसेच मोबदल्यासाठी कमिशन मागणाऱ्या प्रांताधिकारी व इतर अधिकाऱ्यांवर व दलालांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

माणगाव (जि.रायगड) तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी संपादित होणाऱ्या जमिनीच्या अनुषंगाने प्राप्त बाधित

शेतकऱ्यांची निवेदने जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी शासन पत्र, दि.३०.१०.२०१७ अन्वये पाठविण्यात आलेली आहेत.

प्राप्त तक्रारी निवेदनांच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, माणगाव यांचेकडून संबंधितांची सुनावणी लावून दोन्ही पक्षकारांचे लेखी म्हणणे दाखल करुन गुणवत्तेनुसार व शासन नियमानुसार नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.तसेच प्रकल्पग्रस्तांची नावे ७/१२ वरुन कमी करण्यात आलेली नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हैसकर एन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीने शासनासोबत केलेल्या कराराचे मुद्रांक शुल्क न भरल्याबाबत

**(३४) * ९५०६९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाचे काम करणाऱ्या आयआरबीच्या म्हैसकर एन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीने मुंबई-पुणे हा द्रुतगती महामार्ग चालविण्यास घेतला असून कंपनीने शासन व कंपनीमध्ये झालेल्या कराराची नोंदणी शासन नियमानुसार केली नसल्याचे व करारानुसार आवश्यक असलेले मुद्रांक शुल्क भरले नसल्याचे दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य रस्ते विकास महामंडळाने याबाबत खुलासा करावा असे आदेश उच्च न्यायालयाने दिले असून त्याबाबत अद्यापी खुलासा सादर करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नियमानुसार कराराची नोंदणी न करणाऱ्या व त्याबाबतचे मुद्रांक शुल्क न भरणाऱ्या या कंपनीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

टाईम्स ऑफ इंडीया या प्रस्तावास दि.२८ जुलै, २०१७ रोजी या आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

सिव्हील पी. आय. एल ३८/२०१७ मधील याचिका कर्त्याच्या रिजॉइन्डर शपथपत्रामध्ये मुद्रांक शुल्कांच्या अनुषंगाने उल्लेख असून प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३), (४) व (५) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## सावखेड तेजन ते चिंचोली (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) या रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत

**(३५) * १०१६०५ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावखेड तेजन ते चिंचोली (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) या रस्त्याची दुरवस्था झाल्याने या मार्गावरील हनवतखेड, वाघोरा, सुलजगांव, माहेरखेड, चिंचोली व खामगांव या गावातील ग्रामस्थांना तसेच वाहनचालकांना प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त रस्त्याची तातडीने दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत खरे आहे.

(२) जिल्हा परिषदेमार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(३) सावखेड तेजन हनवतखेड माहेरखेड वाघोरा ते सुजलगाव फाट्यापर्यंत रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र.१६९ चा भाग रस्ता आहे. या भाग रस्त्याची लांबी १०.५० कि.मी. आहे. या रस्त्याचे ५.०० कि.मी. लांबीतील खड्डे भरण्याचे काम ३०५४ रस्ते व पुल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ अंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे.

सुजलगाव फाट्यापासून चिंचोली जहागीर पर्यंत रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३७ व ३९ असून सुस्थितीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेड (जि.रत्नागिरी) येथील प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत

**(३६) * ९९९०३ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) येथील प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाची निविदा सन २०११ मध्ये पूर्ण झाली असताना व सन २०१३ पर्यंत काम पूर्ण करण्याची मुदत असताना या मुदतीपर्यंत केवळ प्लींथ लेवलपर्यंतचे काम पूर्ण झाले असून अद्यापपर्यंत एकंदरीत १० ते १५ टक्के काम पूर्ण झाले असल्याचे व गत ६ महिन्यांपासून काम बंद असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी काम पूर्ण होण्याबाबत कोणताही आराखडा नसल्याचे स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रशासकीय इमारतीत अनेक महत्वाची कार्यालये सुरु होणार असल्याने ग्रामीण भागातून येणा-या जनतेला सोयीचे ठरणार असून या इमारतीचे काम पूर्ण करण्यास जाणीवपूर्वक विलंब लावला जात असल्याने याबाबत चौकशी करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर प्रशासकीय इमारतीचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच कामास जाणीवपूर्वक विलंब लावणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) खेड (जि.रत्नागिरी) येथील प्रशासकीय इमारतीच्या कामास दि.२४/८/२०११ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला. मूळ आराखड्यानुसार नवीन इमारत (तळमजला) अस्तित्वातील जुनी इमारती पाडून बांधण्यात येणार होती. तथापि अस्तित्वातील इमारतीतील कार्यालये इतरत्र स्थलांतरीत करण्यास महसूल व पोलीस विभागाकडून ४ वर्षाचा कालावधी लागला असल्याने अस्तित्वातील इमारती पाडण्याचे काम डिसेंबर, २०१५ मध्ये पूर्ण होऊन प्रत्यक्षात नवीन इमारत बांधकामास जानेवारी, २०१६ मध्ये सुरूवात झाली आहे. जागेच्या उपलब्धतेनुसार मूळ आराखड्यात बदल करून तळमजला+३ मजले बांधकामाचे आराखडे सुधारीत करण्यात आले. सद्यस्थितीत तळमजल्याचे स्लॅबपर्यंत काम पूर्ण झाले आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) इमारत बांधण्यासाठी जागा वेळेत उपलब्ध न झाल्याने इमारत पूर्ण करण्यास विलंब झाला आहे. सद्यस्थितीत इमारत बांधकाम प्रगतीत आहे. तसेच इमारत त्वरीत पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## भालोद ते बामणोद (ता.यावल, जि.जळगाव) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३७) * ९९८१९ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भालोद ते बामणोद प्रजिमा-१३ किमी-२२/०० ते २४/५०० (ता.यावल, जि.जळगाव) या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने रस्ता ४ ते ५ महिन्यामध्ये नादुरुस्त झाला असून सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी गैरसोयीचा झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच रावेर (जि.जळगाव) मतदारसंघातील अंकलेश्वर-बऱ्हाणपूर रामा-०४ (भाग-रावेर ते चोरवड) या रस्त्याची दुरवस्था होऊन रस्ता वाहतुकीस अयोग्य झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही रस्त्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार भालोद ते बामणोद या रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत तसेच अंकलेश्वर-बऱ्हाणपूर रामा-०४ (भाग-रावेर ते चोरवड) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन रस्त्याच्या लांबीत २-३ ठिकाणी carpet चा काही भाग खराब झाला होता. सबब कंत्राटदारास लेखी सूचना देऊन सदर भागाची दुरुस्ती करुन घेण्यात आली असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आला आहे व वाहतुक सुरळीत आहे.
(२) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन काम मंजूरी, प्राधान्य व निधीच्या उपलब्धततेनुसार करण्याचे नियोजन आहे. तथापि, सद्यस्थितीत प्रश्नाधीन रस्त्यावरील पडलेले खड्डे भरुन सदरचा रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आलेला आहे व वाहतुक सुरळीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) या तालुक्यांतील १७ रस्त्यांच्या दर्जोन्नतीच्या प्रस्तावास मान्यता देऊन अहमदनगर ते बीड या राज्यमार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३८) * १००६०७ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील अहमदनगर ते बीड या राज्यमार्गाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय

होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच आष्टी, पाटोदा व शिरूर या तालुक्यांतील (जि.बीड) १७ रस्त्यांच्या दर्जोन्नतीचा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार बीड जिल्ह्यातील अहमदनगर ते बीड या राज्यमार्गाची दुरुस्ती करण्याबाबत व आष्टी, पाटोदा व शिरूर या तालुक्यांतील १७ रस्त्यांच्या दर्जोन्नतीच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३), (४) व (५) बीड जिल्हयातील नगर ते बीड हा रस्ता केंद्र शासनाने राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केला आहे. या रस्त्याचे हस्तांतरण केंद्र शासनाकडे करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. रस्त्याची सुधारणा करण्याचे काम केंद्रशासनामार्फत होणे अपेक्षित आहे. सद्यस्थितीत हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खडडे भरुन रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे. आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यातील रस्त्याची दर्जोन्नतीचा आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

-----------------

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पश्चिम पट्टयात तांदळावर मावा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(३९) * ९९४७८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पश्चिम पट्टयात तांदळावर मोठया प्रमाणावर मावा रोगाचा प्रादुर्भाव होऊन येथील शेतकरी विशेषत: आदिवासी शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने या भागाची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार पीकांचे पंचनामे करुन येथील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आंजर्ले-हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील मच्छिमार नौका बुडाल्याबाबत

**(४०) * ९८५६५ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंजर्ले - हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील मच्छिमार बांधवांच्या पाच नौका दिनांक १८ व १९ सप्टेंबर, २०१७ या दरम्यान झालेल्या अतिवृष्टी व वादळामुळे समुद्रात बुडाल्या असल्याचे दिनांक २० सप्टेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नौकेवरील काही मच्छिमार बांधव बेपत्ता झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुसळधार पाऊस व वादळ या नैसर्गिक आपत्तीमुळे काही ठिकाणच्या गरीब मच्छिमार बांधवाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन आपत्तीग्रस्त मच्छिमार बांधवाना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) दि. १९ सप्टेंबर २०१७ रोजी वादळी वाऱ्यामुळे व समुद्रलाटांमुळे संरक्षण मिळावे यास्तव नौका आजर्ले खाडीत जात असताना इंजिन बंद पडल्यामुळे पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत येऊन समुद्राच्या लाटांमुळे ३ नौका पलटल्या व बुडाल्या. २ नौका लाटांमुळे किनाऱ्याला फेकल्या गेल्या.

(२) सदर घटनेत २९ खलाशांपैकी २७ खलाशांना सुरक्षित आणण्यात आले. तसेच १ खलाशी बेपत्ता असुन १ खलाशी मृत झाला आहे..

(३) काही नौकांचे दोरखंड तुटून नांगर बाहेर आले. काही नौकांच्या छोट्या डिंग्यांचे समुद्र लाटेमुळे नुकसान झाले आहे.

(४) अपघातग्रस्त होऊन पुर्णपणे निकामी झालेल्या नौकेबाबत संबंधित नौका मालकास पुनर्वसन अंतर्गत राष्ट्रीय सहकार विकास निगम या अर्थसहाय्याद्वारे मदत देण्याचा प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडुन कार्यवाहित आहे.

मृत व बेपत्ता मच्छिमारांच्या वारसांना मासेमार संकट निवारण निधी योजनेतून तसेच केंद्रीय अपघात गट विमा योजनेतून अर्थसहाय्य देण्यात येत आहे.

नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित मच्छिमारांना  महसुल व वन विभाग़ाच्या दि. १३.०५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मदत देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील पुलांची दुरुस्ती करून कोडोली ते बोरपाडळे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(४१) * ९८४४७ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली ते बोरपाडळे (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) हा ७० वर्षे जुना पूल बेंगलोर, कोल्हापूर, रत्नागिरी व कोकणला जोडणारा अत्यंत महत्वाचा पूल असून सदर पूल कमकुवत झाल्यामुळे वाहून जाण्याचा धोका निर्माण झाल्याचे तसेच पुलावरून अवजड व इतर वाहनांची कायम वाहतूक होत असल्यामुळे प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील छोट्या-मोठ्या आठ पुलांची दुरवस्था होऊन सदर पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार कोडोली ते बोरपाडळे या पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत तसेच कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील नादुरुस्त आठ पुलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदपूर ते पानगांव (ता.रेणापूर, जि.लातूर) या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(४२) * १०४०४२ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)अहमदपूर ते पानगांव (ता.रेणापूर, जि.लातूर) या रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे रस्त्याची दुरवस्था होऊन रस्ता वाहतुकीस अयोग्य झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करून रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्याचा काही भाग अवजड वाहतुकीमुळे व अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झाला होता.

सदर रस्त्याचा दोषदायित्व कालावधी सुरु असल्यामुळे संबंधित कंत्राटदाराकडून क्षतिग्रस्त रस्ता दुरुस्त करुन घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत असून वाहतुक सुरळीत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील २३ गावांमध्ये भूस्खलन व दरड कोसळण्याचा धोका असल्याबाबत

**(४३) * ९८६१७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण**

**(बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीन (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाकडून संभाव्य आपत्ती येण्याची शक्यता असलेल्या निवड यादीतील १५० गावांच्या अहवालामधील २३ गावांमध्ये भूस्खलन व दरड कोसळण्याची मोठ्या प्रमाणात संभाव्यता असल्याचे सीओईपी, पुणे यांनी नमूद केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच आंबेगाव तालुक्यात (जि.पुणे) जास्त प्रमाणात पाऊस पडत असल्याने अलिकडे अनेकवेळा गंभीर स्वरुपाच्या दुर्घटना घडत असून माळीण सारख्या दुर्घटनेची पुनरावृत्ती होऊ नये व खबरदारीचे उपाय त्वरित करता यावेत यासाठी आंबेगाव येथे कायमस्वरुपी आपत्ती निवारण कक्षाची यंत्रणा निर्माण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमाराच्या पत्राद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या २३ गावांमध्ये भूस्खलन व दरड न कोसळण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत तसेच आपत्ती निवारण कक्षाची यंत्रणा आंबेगाव येथे स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) सन्मानीय लोकप्रतिनिधींनी पत्रान्वये केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) २३ संभाव्य दरडग्रस्त गावांमध्ये संरक्षणात्मक कामे करण्यासाठी रु.३६५.२३ लक्ष एवढा निधी जिल्हाधिकारी, पुणे यांना उपलब्ध करण्यात

आला आहे.आंबेगाव तहसिल कार्यालयामध्ये दिनांक १ जुन २०१७ ते ३० सप्टेंबर २०१७ कालावधीत शासनाचे निर्देशाप्रमाणे मध्यवर्ती आपत्ती नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला होता.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंडपिपरी (ता.गोंडपिपरी, जि.चंद्रपूर) व जैतापूर (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४४) * ९८५१२ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडपिपरी (ता.गोंडपिपरी, जि.चंद्रपूर) येथील धाबा ते धाबा बेघर या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खडडे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे वाहन चालक, विद्‌यार्थी व सामान्य नागरिकांना प्रवास करणे गैरसोयीचे झाले असून रस्त्याच्या दुरुस्तीबाबत संबंधितांकडे तक्रार करूनसुद्धा कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे तसेच याच तालुक्यातील पोडस येथील वर्धा नदीवरील पुलाला संरक्षक कठडे नसल्याने अपघात घडून एका प्रवाशाचा मृत्यु झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच जैतापूर (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) या गावात पोहोचण्यासाठी असलेल्या भोयरगाव ते जैतापूर व नांदगाव ते जैतापूर या रस्त्यांची दुरवस्था झाल्याने येथील विद्‌यार्थी व नागरिकांना प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही ठिकाणच्या रस्त्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार गोंडपिपरी येथील धाबा ते धाबा बेघर तसेच भोयरगाव ते जैतापूर व नांदगाव ते जैतापूर या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत तसेच पोडस येथील वर्धा नदीवरील पुलाला संरक्षक कठडे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रश्नाधिन रस्त्याची दुरावस्था झालेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील पोडस येथील वर्धा नदीवरील पुल हा बुडीत पुल असून पुलास लावण्यात आलेले कठडे पावसाळा सुरु होण्यापूर्वी काढण्यात येतात व पावसाळा संपल्यानंतर पुन्हा लावण्यात येतात असे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे. प्रश्नात उल्लेखित अपघात हा दि.१९.०८.२०१७ रोजी झाला तेव्हा पावासाळा सुरु असल्यामुळे कठडे काढण्यात आले होते. पावसाळा संपल्यानंतर पुलाला कठडे लावण्यात आले आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.

(४) गोंडपिंपरी येथील धाबा ते धाबा बेघर वस्ती हा ग्रामीण मार्ग क्र. २५ असून या रस्त्याची लांबी १.५० कि.मी. आहे. या रस्त्याचे दुरुस्तीचे काम सन २०१३-१४ मध्ये मंजूर करण्यात आले होते. प्रत्यक्ष काम सुरु करतेवेळी रस्त्याच्या लगतच्या दोन शेतक-यांनी जागेच्या मालकी हक्काबाबत वाद निर्माण केल्यामुळे रस्त्याचे काम करता आलेले नाही.

भोयगाव ते जैतापूर हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र.१७ असून सद्यस्थितीत सुस्थितीत आहे.

तसेच नांदगाव ते जैतापूर हा ग्रामीण मार्ग क्र. २९ असून या रस्त्याची लांबी ५.५० कि.मी. आहे. त्यापैकी ०/०० ते १/४५० कि.मी. डांबरी पृष्ठभाग असून सुस्थितीत आहे. १/४५० ते ५/५०० कि.मी. खडी पृष्ठभागापैकी २/०० ते ५/०० कि.मी. लांबी पुरहानी दुरुस्ती योजनेअंतर्गत दुरुस्त करण्यात आलेली असून वाहतुकीस योग्य आहे. १/४५० ते २/०० कि.मी. रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करण्याचे काम जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील पोडस येथील वर्धा नदीवरील पुल हा बुडीत पुल असून पुलास लावण्यात आलेले कठडे पावसाळा सुरु होण्यापूर्वी काढण्यात येतात व पावसाळा संपल्यानंतर पुन्हा लावण्यात येत असतात. पावसाळा संपल्यानंतर पुलाला कठडे लावण्यात आले आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे. तसेच पुलाची दुरुस्ती करण्याच्या कामास मंजुरी प्राप्त असून, कामाची निविदा निश्चितीची प्रक्रिया प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कविलगाव (नेरूर) (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील जागेची चुकीची मोजणी करून मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत

**(४५) * ९७२२७ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कविलगाव (नेरूर) (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील सर्व्हे नं.३१ पो.हि. '१२ अ' आणि '१३ य' या जागेची भूमी अभिलेख अधिकारी, कुडाळ व सर्व्हेअर श्री.हमीद शेख यांनी चुकीची मोजणी करून मिळकतदाराच्या मालमत्तेचे नुकसान केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व अधीक्षक, भूमी अभिलेख, कुडाळ यांच्याकडे पत्राद्वारे विनंती करण्यात आली असूनसुद्धा कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्या अनुषंगाने सदर जमीन मिळकतदाराच्या नावे परत करण्याबाबत व गैरव्यवहार करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

(३), (४) व (५) श्री सुरेश जनार्दन म्हाडदळकर यांनी दिनांक ८.१२.२०१६ रोजी केलेल्या तक्रारी अर्जानुसार उपअधीक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांचे कार्यालयाकडून दिनांक ४.०३.२०१७ रोजी चौकशी करण्यात आली असून फेर हद्द दाखविण्यात आली आहे.दिनांक २०.०३.२०१७ रोजी सुधारित 'क' प्रत देण्यात आली आहे.

सदर फेरतपासणी मोजणी श्री.म्हाडदळकर यांना मान्य नसल्याची तक्रार दिनांक १९.११.२०१७ रोजी प्राप्त झाल्याने दिनांक २८.११.२०१७ रोजी पुन्हा प्रत्यक्ष जागेवर जावून चौकशी करण्यात आलेली आहे.

मौजे कविलगाव, (ता.कुडाळ, जि.सिंधूदूर्ग) येथील स.नं.३१, हिस्सा नं. १२ अ व १३ ची हद्द कायम मोजणी श्री.सुरेश जनार्दन म्हाडदळकर यांचे विनंतीवरुन करण्यात आली. सदर जमिनीचे लगत धारक यांनी त्यांचे स.नं. ३१, हिस्सा नं. ११/९६ ची हद्दकायम मोजणी करुन घेतली. सदर मोजणी मान्य नसल्याने श्री.म्हाडदळकर यांनी जिल्हाधिकारी व उप अधीक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांचेकडे तक्रार केली. तक्रारीचे अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

उप अधीक्षक भूमि अभिलेख, कुडाळ यांचे तपासणीमध्ये असे निदर्शनास आले की, श्री.म्हाडदळकर यांचे स.नं. ३१, हि.नं. १२ अ व १३ ची मोजणी मूळ अभिलेखाचा आधार घेवून कायम केली असल्याने ती बरोबर आहे.

लगत धारक श्री.अनिल चौथमल पाटोदिया यांचे सर्वे ३१, हि.नं. ११/९६ ची मोजणी रेखांकन नकाशाचे आधारे केली असल्याने ती सदोष आहे.

त्यामुळे सदरचा मोजणी नकाशा नियमाप्रमाणे दुरुस्त करुन सुधारित मोजणी नकाशे पुरविण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयामार्फत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सिंधुदुर्ग यांना दि.०७/१२/१७ रोजीच्या पत्राने देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील नविन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास मंजुरी देण्याबाबत

**(४६) * ९५१५३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील नविन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी अधिक्षक अभिंयता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी १२ कोटी ६५ लक्ष रूपयांच्या अंदाजपत्रकासह प्रस्ताव तयार करून सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांच्याकडे दिनांक १५ मार्च, २०१५ रोजी सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अडीच वर्षापासून सदर प्रस्ताव सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या कार्यालयात मंजूरीविना प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सिंदेवाही येथील नविन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे. सदर कामाचा प्रस्ताव रुपये १२.६५ कोटीचा नसून रुपये १३.२१ कोटीचा प्राप्त झाला आहे

(२), (३), (४) व (५) सदर कामाचे १३.२१ कोटी रकमेचे अंदाजपत्रक शासनास प्राप्त झाले आहे. निधी, निकष व अग्रक्रम यावर काम हाती घेणे अवलंबून राहील.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील अवैध वाळू उपशाबाबत

**(४७) * ९७३८३ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील राजगोळी-चन्नेट्टी परिसरातून दररोज किमान २०० ते २५० ट्रक वाळूचा विनापरवाना उपसा होत असल्याचे व या अवैध वाळू उपशामुळे शासनाच्या कोटयवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान होऊन पर्यावरणाचाही ऱ्हास होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरित लवादाच्या वाळू उपशाबंदीच्या निर्णयामुळे गत चार महिन्यापासून राज्यातील वाळूचा उपसा बंद असल्याने कोल्हापूर जिल्हयात वाळूची प्रचंड टंचाई निर्माण झाली असताना वाळू माफियाकडून मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या अवैध वाळू उपशाबाबत स्थानिक जनतेनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार चंदगड तालुक्यात व एकंदरीत कोल्हापूर जिल्हयात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करून पर्यावरणाचे संरक्षण करण्याबाबत तसेच उक्त जिल्हयातील वाळू लिलाव शासनामार्फत करून वाळूची टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, स्थानिक वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) राष्ट्रीय हरित लवादाने यांत्रिकी साधनांचा वापर करुन वाळू उपसा करण्यास प्रतिबंध केला आहे. मात्र त्यामुळे कोल्हापूर जिल्हयात वाळूची प्रचंड टंचाई निर्माण झाल्याची व मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३), (४) व (५) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे दि. १८/८/२०१७ व दि.२३/१०/२०१७ रोजी या संदर्भात दोन तक्रार अर्ज प्राप्त झाले होते.

चंदगड तालुक्यामध्ये ताम्रपणी व घटप्रभा या दोन नद्या असून त्यामध्ये वाळूचे साठे उपलब्ध नसल्याने मौजे राजगोळी-चन्नेहट्टी या परिसरात अवैध वाळू उपसा होत नाही.

सन २०१७-१८ या वर्षाकरिता कालबध्द कार्यक्रमानुसार रेती / वाळू लिलाव प्रक्रिया करण्यात येत आहे.

दि.१/४/२०१७ ते दि.३१/१०/२०१७ या कालावधीत कोल्हापूर जिल्हयामध्ये अवैध वाळू वाहतूकीच्या ९२ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करुन रक्कम रु.३०,९७,९००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोळा ते बाणूरगड (जि.सांगली) या घाट रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) * ९७०९० श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगोला व आटपाडी तालुक्यांना जोडणा-या कोळा ते बाणूरगड (जि.सांगली) या घाट रस्त्याच्या बाजूचे संरक्षक कठडे तुटले असून माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१७ मध्ये घाटाच्या बाजूने डोंगराची दरड कोसळून रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घाट रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार कोळा ते बाणूरगड या घाट रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हा परिषद सोलापूर मार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आली आहे.
(३) कोळा ते बानूरगड हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र. ८४ असून या रस्त्याची लांबी ६.०० कि.मी. आहे. ०/०० ते २/०० रस्त्याचे डांबरीकरण जिल्हा विकास योजना सन २०१६-१७ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून झालेले आहे. २/०० ते ४/०० कि.मी. लांबीमध्ये तेरावा वित्त आयोगामधून डांबरीकरणाचे काम करण्यात आले आहे. तसेच ४/०० ते ४/५०० मधील लांबी सुस्थितीत आहे. ४/५०० ते ५/६०० कि.मी. लांबीतील रस्ता डांबरीकरणाचे काम ग्रामीण रस्ते विकास व मजबूतीकरण कार्यक्रम सन २०१७-१८ मध्ये मंजूर असून निविदास्तरावर आहे.

या रस्त्यावर ४/६०० ते ६/०० मध्ये घाटाचा भाग असून पाच ठिकाणी वळणे आहेत. मैलमजूरांमार्फत ढासळलेली दरड व रस्त्यावर आलेले दगड माती बाजूला करुन रस्ता वाहतुकीस योग्य केलेला आहे.

डोंगर माथ्याला स्लोप मध्ये कटींग करुन दुरुस्त करणे व तुटलेले संरक्षक कठडे दुरुस्त करणे आवश्यक असून जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून सदरचे काम करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## अर्धापूर (ता.अर्धापूर, जि.नांदेड) येथील जिल्हा मार्गावर जिओ कंपनीने अनधिकृतपणे खोदकाम केल्याबाबत

**(४९) * ९९३९५ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्धापूर (ता.अर्धापूर, जि.नांदेड) येथील भोकर फाटा ते भोकर महामार्गावरील बारसगाव पाटी ते येळेगाव-देगांवकडे जाणा-या प्रमुख जिल्हा मार्गाच्या लांबीमध्ये जिओ मोबाईल कंपनीने अनधिकृतपणे खोदकाम करुन शासकीय मालमत्तेचे नुकसान केले असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त मार्गावर अनधिकृतपणे खोदकाम करुन शासकीय मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या जिओ मोबाईल कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) खरे आहे.

(२) व (३) बारसगांव पाटी ते येळेगाव या दोन गावांच्या दरम्यान जिओ कंपनीचे ठेकेदार श्री.जनक माने हे अनधिकृतरित्या रस्ता खोदकाम करतांना आढळून आले. त्यांच्या विरोधात पोलीस ठाणे, अर्धापूर येथे तक्रार दाखल

करण्यात आली असून त्यांच्यावर अदखल पात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर ठेकेदाराने स्वखर्चाने सदर रस्ता पुर्नस्थापित करुन दिला असून वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर येथील प्रियदर्शनी चौकातील बस स्थानकाकडे जाणारा रेल्वे पूल बांधून वरोरा नाका उड्डाण पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५०) * १०४०१९ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील प्रियदर्शनी चौकातील बस स्थानकाकडे जाणारा रेल्वे पूल जीर्ण झाला असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माहे ऑक्टोबर, २०१७ च्या सर्वेक्षनात निदर्शनास आले असून सदर पूल कोणत्याही क्षणी कोसळून मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे नवीन पुलाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ६० कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चंद्रपूर येथील वरोरा नाका उड्डाण पुलाचे काम गत ७ वर्षापासून सुरु असून याबाबत संबधित अधिकारी व कंत्राटदार यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करून देखील या कामाकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार प्रियदर्शनी चौकातील बस स्थानकाकडे जाणाऱ्या रेल्वे पुलाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत तसेच वरोरा नाका उड्डाण पुलाचे काम तातडीने पूर्ण करून पुलाच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) चंद्रपूर शहरातील प्रियदर्शनी चौकातील अस्तित्वातील रेल्वे उड्डाणपुलाजवळ समांतर रेल्वे पुलाचे बांधकामाचा प्रस्ताव रेल्वे विभागास सादर करण्यात आला आहे.

(२), (३), (४) व (५) वरोरा नाका उड्डाणपूलाचे मूल रोड ते नागपूर रोड पर्यंतचे मुख्य उड्डाणपूलाचे बांधकाम पूर्ण झाले असून या पूलावरुन वाहतूक सुरु आहे. सदर उड्डाणपुलाचे मूलकडून डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेजकडील भागाचे १ पिअर व ४ सुपरस्ट्रक्चरचे काम वगळता पूर्ण झाले आहे.

वरोरा नाका चौकात होणा-या वाहतुकीच्या कोंडीमुळे काम करण्यास अपुरा कालावधी मिळणे, केबल हटविणे तसेच इलेक्ट्रीक वायर स्थलांतर करणे, जमीनीखालील पाण्याचे पाईप लाईन स्थलांतर करणे इ. सर्व बाबींमुळे निर्धारित वेळेत पूर्ण होऊ शकले नाही. कंत्राटदाराच्या अडचणी विचारात घेऊन कंत्राटदारास मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि वाढीव मुदतीत काम पूर्ण न झाल्याने कंत्राटदारास दंड आकारणी करण्यात आली आहे.

प्रियदर्शनी चौकातील रेल्वे पुलाचे बांधकामाच्या प्रस्तावास रेल्वे विभागाची मान्यता अप्राप्त आहे.

-----------------

## मुंबईमधील जमिनीवर आकारण्यात येणारा अकृषक कर रद्द करण्याबाबत

**(५१) * ९६०८४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील जमिनीवर अकृषक कर आकाराला जात असल्याचे व त्याचे मोठ्या संख्येमध्ये थकबाकीदार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील अनेक जमिनींचे जमीन मालक मिळत नसल्याने वर्षानुवर्षे या कराची थकबाकी वाढत असल्याचे व त्याचा कर भार सदर जमिनीवर उभ्या असणाऱ्या गृहनिर्माण संस्थांवर पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मुंबईमधील जमिनीवरील अकृषक कर रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई मध्ये मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यापैकी मुंबई शहर जिल्ह्यामध्ये अकृषिक कर आकारण्यात येत नाही. मुंबई उपनगर जिल्ह्यात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि त्याखालील महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ मधील तरतूदीनुसार, कृषी जमिनीच्या वापरात बदल करून अशा जमिनीचा अकृषिक प्रयोजनार्थ वापर केल्यास, या जमिनीच्या सदर वापराकरीता वार्षिक जमीन महसूल म्हणून अकृषिक कराची आकारणी करण्यात येते. या आकारणीसाठी दि.१ ऑगस्ट ते पुढील वर्षाच्या दि. ३१ जुलै पर्यंतचा कालावधी विचारात घेण्यात येतो. या कालावधीतील अकृषिक कर संबंधित भोगवटादार यांच्याकडून आणि भोगवटादार यांनी यात कसूर केल्यास त्या जमिनीवर वहिवाट करणा-या व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून वसूल करण्यात येतो. अशा व्यक्तींनी/ संस्थांनी आकारण्यात आलेला अकृषिक कर शासन जमा न केल्यास तो थकबाकी म्हणून वसूल करण्यात येतो.

त्यासाठी संबंधितांना थकबाकीच्या मागणी संबंधीची नोटीस देऊन अशी थकबाकी नियमानुसार वसूल करणे अपेक्षित आहे. उक्त कार्यपद्धतीनुसार मुंबई उपनगर जिल्ह्यात अकृषिक कराची मागणी नोटीस संबंधितांना बजावण्यात आलेल्या आहेत.

अकृषिक कर हा जमिनीच्या अकृषिक वापरासाठीचा शासनाचा सार्वभौम कर आहे. त्यामुळे सदर कर रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील हायकोर्ट ते सोहम मोटर्स मुकुंदवाडी सर्व्हिस रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(५२) * १०२७७१ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील हायकोर्ट ते सोहम मोटर्स मुकुंदवाडी सर्व्हिस रस्त्याचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने ७२ लक्ष रूपये खर्च करून केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याने सहा महिन्यात या रस्त्याच्या डांबरी कामाचा वरील भाग (सर्फेस) उखडला असून खडी उघडी पडल्याचे तसेच डाव्या व उजव्या बाजूच्या शोल्ड मध्ये मुरूमाचा भराव न टाकल्यामुळे रस्त्याच्या कडाही निखळल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर सर्व्हिस रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम दि.३०.०६.२०१७ रोजी निवेदेतील अटी व शर्तीनुसार पूर्ण झालेले आहे. सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील वाळू तस्करीबाबत

**(५३) * १०३०२८ श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील कोणताही वाळू लिलाव शासनातर्फे झाला नसतांना नायब तहसीलदार, जळगाव तालुका व महसूल विभागातील इतर अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाळू माफिया लाखो रुपयांच्या वाळूची अहोरात्र तस्करी करत असल्याचे व या वाळूच्या वाहनांमुळे अपघात घडून अनेक नागरिकांचे बळी जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील वाळू तस्करीबाबत चौकशी करण्याचे आदेश विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक ४ एप्रिल, २०१६ रोजी जिल्हाधिकारी, जळगाव यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या जिल्हयात विनापरवाना वाळू तस्करी करणाऱ्या वाळू माफियांवर तसेच त्यांना मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून वाळूच्या वाहनांमुळे बळी गेलेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) जळगांव जिल्हयात सन २०१६-१७ मध्ये वाळू लिलाव झाले होते.

जळगाव जिल्हयात वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे वर्ष २०१७ मध्ये ३ अपघात होऊन सदर अपघातांमध्ये एकूण तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

निवासी नायब तहसिलदार जळगाव, तहसील कार्यालय, जळगांव यांच्या विरुध्द कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा केल्याबद्दलच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दि.४/७/२०१६ रोजी दिलेल्या चौकशीच्या निदेशांनुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी केली असून या चौकशीत निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय जळगाव यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्याने त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

दि.१/४/२०१७ ते दि.२८/११/२०१७ अखेर गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या १०३६ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रक्कम रुपये १,८३,४९,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला असून ७६ वाहनांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नियम डावलून वाहन योग्यता प्रमाणपत्र देण्यात येत असल्याबाबत

**(५४) * ९५५६९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठाणे, पनवेल, औरंगाबाद, कोल्हापूर व यवतमाळ येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातून रस्त्यावर चालविण्यासाठी वाहन योग्य आहे किंवा नाही, याची चाचणी न करताच कार्यालयात बसून दिवसाला शेकडो वाहनांना वाहन योग्यता प्रमाणपत्र दिले जात असल्याची बाब दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ रोजी तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पथकाने केलेल्या पाहणीत निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती संबंधित प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच अशा प्रकारांना आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.२८/२०१३ मध्ये परिवहन संवर्गातील वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण तपासणीचे व्हिडिओ चित्रीकरण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार परिवहन आयुक्तालयातील वरिष्ठ अधिका-यांच्या पथकाने ठाणे,पनवेल,औरंगाबाद, कोल्हापूर व यवतमाळ याठिकाणचे वाहन योग्यता प्रमाणपत्राच्या नूतनीकरणाचे चित्रीकरण तपासले असता, मोटार वाहन कायदा कलम ६२ नुसार निर्धारित सर्व तपासण्या केल्याचे व्हिडिओ चित्रीकरणात दिसून आले नाही. त्यामुळे दि.२१.०८.२०१७ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीतील निर्णयानुसार संबंधित अधिका-

यांवर प्रशासकीय कारवाई करण्यासाठी संबंधित मोटार वाहन निरीक्षक व त्यांचे नियंत्रक अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पूर्णा ते लक्ष्मीनगर (ता.पूर्णा, जि.परभणी) या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(५५) * ९६९६० डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा ते लक्ष्मीनगर (ता.पूर्णा, जि.परभणी) या १२ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम संबंधीत कंत्राटदाराकडून दिनांक १६ मार्च, २०१७ रोजीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना अद्यापी काम अपूर्ण असून अत्यंत संथगतीने काम सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे ओह काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करून संथगतीने काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तापी नदीच्या (ता.चोपडा, जि.जळगांव) काठावरील धानोरा परिसरातील शेतक-यांच्या पिकांचे झालेले नुकसान

**(५६) * १०१७५९ श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तापी नदीच्या (ता.चोपडा, जि.जळगांव) काठावरील धानोरा परिसराला दिनांक २० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास वादळाचा तडाखा बसून शेतकऱ्यांच्या पिकांचे सुमारे १० कोटी रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धानोरा परिसराची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) दिनांक २० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आलेल्या वादळामुळे जळगांव जिल्हयातील चोपडा तालुक्यातील तापी नदीच्या काठावरील धानोरा परिसरातील सुमारे १४ गावांतील ३९०.५६ हे. क्षेत्रावरील शेतीपिकांचे ३३% च्या वर नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले.

त्यानुसार धानोरा परिसरात तहसिलदार चोपडा, तालुका कृषि अधिकारी चोपडा यांनी पाहणी करुन, संबंधित तलाठी व कृषिसहायक व ग्रामस्तरीय समिती यांच्यामार्फत पंचनामे करण्यात आलेले आहेत. त्यानुसार माहे सप्टेंबर २०१७ मध्ये शेतीपिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत क्षेत्रीय स्तरावरुन संयुक्त स्वाक्षरीचा अहवाल प्राप्त होताच, नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर-गारगोटी (जि.कोल्हापूर) या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबत

**(५७) * ९६४१३ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर-गारगोटी (जि.कोल्हापूर) या रस्त्याचे सहा महिन्यापूर्वी डांबरीकरण व खडीकरणाचे काम केले असून अल्पावधीत रस्त्यावरील खडी वाहून गेल्याचे तसेच ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली होती व प्रत्यक्षात किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच पुनश्चः रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापी, प्रश्नांकित रस्त्याच्या कि.मी. ४२/०० ते ४९/४००, ५५/०० ते ५७/०० या ७.६ कि.मी. लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याचे तसेच काही लांबीत ग्रेड सुधारण्याचे काम प्रगतीत आहे. या ग्रेड सुधारणा करण्याच्या कामात काही ठिकाणी माती भराव करण्यात आला होता. या लांबीत डांबरीकरणाच्या पृष्ठभागावर काही ठिकाणी खड्डे पडले होते. काम प्रगतीत असल्याने कंत्राटदारांनी त्यांच्या खर्चाने दुरूस्ती केली आहे. या कामामधील अंतिम डांबरीकरण अजून करावयाचे आहे.

(२) सदर कामासाठी रू.११४२.४३ लक्ष तरतूद करण्यात आली असून आतापर्यंत रू. ९४४.९२ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळास एस.टी. मधील फ्री वाय फाय सेवेमुळे होत असलेले नुकसान

**(५८) * १००९८१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.बसवराज पाटील (औसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे सध्या १ लाख चार हजार अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून २०१५-१६ या वर्षामध्ये एकूण उत्पन्न ८६९८ कोटी रुपये तर खर्च ९१७४ कोटी इतका असून एकूण संचित तोटा ४७५ कोटी रुपये असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास दरवर्षी एस.टी. महामंडळाकडे ३ हजार नवीन बसगाड्या सेवेत घेतल्या जातात मात्र ही संख्या सध्या ५०० वर आली असताना महामंडळाकडून एस.टी. मधील फ्री वाय फाय सेवेवर लाखो रुपये खर्च करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार वायफाय सुविधेकरीता आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे तसेच सद्यस्थितीमध्ये वायफाय किट बंद अवस्थेत असल्यामुळे महामंडळास होत असलेल्या तोटयाला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) सन २०१५-१६ मध्ये महामंडळाचे एकूण उत्पन्न रु.७२८४.४८ कोटी इतके होते व महामंडळाचा एकूण खर्च रु.७४६७.२४ कोटी इतका होता. २०१५-१६ अखेर महामंडळाचा संचित तोटा रु.१८०७.२३ कोटी होता.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाकडून आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार धोरणात्मक निर्णय घेवून बसगाड्या खरेदी केल्या जातात. सन २०१७-१८ मध्ये महामंडळाने नवीन प्रकारच्या वातानुकूलित ५०० स्वत:च्या बसगाड्या वाहन ताफ्यात जमा करण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवाशांना त्यांच्या वायफाययुक्त (बिनतारी स्थानिक संगणकीय जाळे) स्मार्टफोनमधून हॉटस्पॉटच्या माध्यमातून मोफत मनोरंजनात्मक सुविधा देणेबाबतचा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी सदर प्रकल्पासाठी मे.यंत्र मिडीया सोलुशन या कंपनीची सेवा पुरवठादार म्हणून निवड करण्यात आली आहे. राज्य परिवहन महामंडळाने सदर प्रकल्पावर कोणत्याही प्रकारचा खर्च केलेला नसून, यापुढेही करावा लागणार नाही. याऊलट राज्य परिवहन महामंडळास सदर प्रकल्पाद्वारे वार्षिक परवानाफी माध्यमातून प्रती वर्ष रु. १.०५ कोटी इतका अतिरिक्त महसूल पुढील ५ वर्षासाठी प्राप्त होणार आहे. तसेच, १ वर्षानंतर सदर कंपनीस जाहीरातीद्वारे मिळणाऱ्या महसूलातील ठराविक टक्केवारी राज्य परिवहन महामंडळास प्राप्त होणार आहे. सदयस्थितीमध्ये काही तांत्रिक कारणास्तव वायफाय उपकरण बंद पडल्यास सदर कंपनीकडून मोफत दुरुस्ती करुन घेण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील भीमा नदीला आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(५९) * १०१२९६ श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर, (जि.सोलापूर) येथील भीमा नदीला आलेल्या पुरामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी व पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून शेतकऱ्यांच्या शेतातील वीज पंपाचे साहित्यही पूरामुळे वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून या नैसर्गिक आपत्तीचे संबंधित प्रशासनाने पंचनामे करण्यास टाळाटाळ करून विलंब केल्याचे दिनांक १९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भीमा नदीच्या पूरामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना निकष न लावता सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी संबंधित शेतकरी यांनी प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार नुकसाग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) "मौजे पिराची कुरोली, ता.पंढरपूर येथील भीमा नदीतील पाण्यामुळे झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करुन शासकीय मदत मिळणेबाबत" या विषयाबाबतची तक्रार सरपंच, ग्रामपंचायत पिराची कुरोली यांनी तहसिलदार पंढरपूर यांच्याकडे दिनांक १६.०९.२०१७ रोजी केल्याचे निदर्शनास आले.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने कृषी सहायक, पिराची कुरोली व गावकामगार तलाठी, पिराची कुरोली यांनी दिनांक १९.०९.२०१७ रोजी संयुक्त पंचनामे केले असता, मौजे पिराची कुरोली येथील शेतजमीनीचे व पिकांचे ३३% पेक्षा कमी नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार ३३% पेक्षा कमी नुकसान झालेल्या शेतीपिकांसाठी मदत अनुज्ञेय नसल्याने मौजे पिराची कुरोली येथील आपदग्रस्तांना मदत देण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा परिषदेत विशेष घटक योजनेतील दुधाळ जनावरे वाटपात झालेला गैरव्यवहार

**(६०) * ९८८३७ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद, अकोला येथील पशुसंवर्धन विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या विशेष घटक योजनेतील दुधाळ जनावरे वाटपात झालेल्या गैरव्यवहारात तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अकोला यांनी नेमलेल्या प्रभारी पशुसंवर्धन अधिकारी यांच्या चौकशी समितीने तीन महिन्यांचा कालावधी झाल्यानंतरही काही ठराविक गावातच पाहणी करुन अहवाल सादर केल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जिल्हयात दुधाळ जनावरे वाटपात मोठा गैरव्यवहार होऊनही प्रभारी पशुसंवर्धन अधिकारी यांनी जिवित, मृत जनावरांची पडताळणी न करता प्रत्येकी ८ हजार रुपयांप्रमाणे चाऱ्याचे देयक काढल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नसून, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांच्या दि.२४.०५.२०१७ रोजीच्या निर्देशानुसार पंचायत समिती, मुर्तिजापूर, अकोट, तेल्हारा, बार्शिटाकळी, पातुर, बाळापूर तसेच, अकोला येथे प्रत्यक्ष भेट देऊन योजनेअंतर्गत वाटप केलेल्या जनावरांपैकी १० टक्के जनावरांची रॅन्डम पध्दतीने पडताळणी केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय. २०१६-१७एकूण ३०९ लाभार्थींना प्रथम एक म्हैस (दुधाळजनावर) पुरवठा करण्यात आली. त्यापैकी पंचायत समिती, अकोट अंतर्गत ३० लाभार्थी व पंचायत समिती, तेल्हारा अंतर्गत ४० लाभार्थी अशा एकूण ७० लाभार्थीकडे योजनेअंतर्गत वाटप केलेली म्हैस उपलब्ध असल्याने, सदर लाभार्थींनी योजनेअंतर्गत पशुखाद्य खरेदी केल्याबाबतची खातरजमा करून, प्रति लाभार्थी रु.७,८७५/-पशुखाद्य अनुदानाची रक्कम डीबीटीव्दारे (DBT) थेट लाभार्थींच्या बँक खात्यात दि.२७/१०/२०१७ रोजी जमा करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड व रत्नागिरी जिल्हयात सक्शन पंपाद्वारे अवैध वाळू उत्खनन होत असल्याबाबत

**(६१) * ९८४३७ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड व रत्नागिरी जिल्हयात सक्शन पंपाद्वारे अवैध वाळू उत्खनन सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अवैध उत्खननामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत असून या अवैध उत्खननावर प्रतिबंध घालण्यात शासकीय यंत्रणांना अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त जिल्हयात अवैध उत्खनन करणाऱ्या रेती माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) रायगड व रत्नागिरी जिल्हयात माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान वाळुचे सक्शन पंपाद्वारे अवैध उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्याकरीता जिल्हा स्तरावर, उपविभागीय स्तरावर व तालुका स्तरावर भरारी पथके गठित करण्यात आली आहेत.

सदर भरारी पथकांमार्फत रायगड जिल्हयात माहे एप्रिल, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या १८८ प्रकरणांमध्ये कारवाई करून सुमारे रू.५६,९९,०५४/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या १८ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच रत्नागिरी जिल्हयात माहे एप्रिल,२०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या १६७ प्रकरणांमध्ये कारवाई करून सुमारे रू.१,०२,०४,०००/- एवढा दंड वसूल करून शासनजमा केला आहे. तसेच ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील तहसीलदारावर कारवाई करण्याबाबत

**(६२) * १०३७६५ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरुड (जि.अमरावती) तालुक्यातील आकस्मिक निधन पावलेल्या व्यक्तींना मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळण्यासाठी आवश्यक असलेली माहिती तहसीलदार, वरुड यांनी शासनाकडे न पाठविल्यामुळे ११ कुटुंबाना दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ पासून मदतीपासून वंचित रहावे लागल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांचेकडे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील श्रावणबाळ तसेच संजय गांधी योजनेच्या लाभार्थ्यांना वाटप करावयाचा निधी दिवाळीपूर्वी उपलब्ध असतानाही तहसीलदार, वरुड यांनी निधीचे वाटप न करून लाभार्थ्यांना मदतीपासून वंचित ठेवले असल्याबाबतही उक्त तक्रारीत नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त तालुक्यातील जनतेला शासनाच्या विविध योजनांपासून तसेच मदतीपासून वंचित ठेवणाऱ्या तहसीलदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अशा स्वरुपाची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधीकडून प्राप्त झाली आहे.

(३) व (४) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्यास विभागीय आयुक्त, अमरावती यांना निर्देश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील सात जिल्हयातील कर्जदार शेतक-यांचे विविध विमा कंपन्यांनी कोट्यवधी रूपये बुडविल्याबाबत

**(६३) * ९६९०१ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील सात जिल्हयातील ७ लक्ष ४८ हजार ११२ कर्जदार शेतक-यांचे विविध विमा कंपन्यांनी ४८.६० कोटी रूपये बुडविले असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विमा कंपन्यानी हवामानावर आधारीत पीक विमा योजनेचे नाव बदलून पंतप्रधान पीक विमा योजना केली असुन ती खरीप व रबी हंगामाकरीता कर्जदार शेतक-यांना पिकांसाठी सक्तींची केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा कंपन्यानी अतिवृष्टी, वन्य प्राण्यांचा हैदोस, गारपीट व अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे विदर्भातील शेतक-यांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता ८५ कोटी ३८ लाख ६६ हजार ८४० रूपयाचा विमा काढला होता परंतु कृषी विभागाने विमा कंपन्याच्या प्रतिनिधींना सोबत घेऊन पंचनामे व पाहणी करून शेतकऱ्यांना फक्त ३६ कोटी ७८ लाख ५० हजार रूपयांची नुकसान भरपाई दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार पीक विम्याची उर्वरीत ४८.६० कोटी रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत व यामध्ये गैरव्यवहार करणाऱ्या विविध पीक विमा कंपनी व कृषी विभागाच्या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) खरीप हंगाम २०१६ मध्ये प्रधानमंत्री पिक विमा योजनेत विदर्भातील ११ जिल्हयांतील १४.०९ लाख कर्जदार व ६.८९ लाख बिगर कर्जदार अशा एकुण २०.९८ लाख शेतकऱ्यांनी रु. १८८.३६ कोटी विमा हप्ता भरुन सहभाग घेतला होता. योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या १.२९ लाख शेतकऱ्यांना रु. ५८.२४ कोटी नुकसान

भरपाई संबंधित विमा कंपन्यांमार्फत निश्चित करण्यात आली असून पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत संबंधीत बँकांना पाठविण्यात आलेली आहे.

तसेच रबी २०१६-१७ मध्ये या योजनेअंतर्गत विदर्भातील ११ जिल्हयांतील २६,४७६ कर्जदार व १७,७२५ बिगर कर्जदार अशा एकुण ४४,२०१ शेतकऱ्यांनी रु.१.७० कोटी विमा हप्ता भरुन सहभाग घेतला होता. योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार नुकसान भरपाईस पात्र ठरलेल्या १,८९८ शेतकऱ्यांना रु. १.५१ कोटी इतकी नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनी मार्फत निश्चित करण्यात आलेली असून संबंधित बँकांमार्फत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावयाची कार्यवाही सुरु आहे.

(२) राज्यात पूर्वी राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय कृषि विमा योजनेच्या ऐवजी खरीप २०१६ पासून प्रधानमंत्री पिक विमा योजना राबविण्यात येत असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सदर योजना कर्जदार शेतकऱ्यांना बंधनकारक आहे.

(३), (४) व (५) प्रधानमंत्री पिक विमा योजनेमध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या जोखमीच्या बाबीं अंतर्गत गारपीट, भुस्खलन व पुराचे पाणी शेतात शिरणे या मुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीस वैयक्तिक स्तरावर पंचनामे करुन विमा संरक्षण दिले जाते.

खरीप २०१६ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या जोखमीच्या बाबीं अंतर्गत विदर्भातील बुलडाणा, अमरावती, अकोला, यवतमाळ, वर्धा, गोंदिया व गडचिरोली या ७ जिल्हयातील ९५२ शेतकऱ्यांना रु १.१४ कोटी नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत संबंधीत बँकाना शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणेसाठी अदा करण्यात आलेली आहे.

तसेच रब्बी २०१६-१७ मध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती या जोखमीच्या बाबीं अंतर्गत विदर्भातील अकोला जिल्हयातील २८ शेतकऱ्यांना रु. ३.३५ लाख नुकसान भरपाई संबंधित विमा कंपनीमार्फत संबंधीत बँकाना शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करणेसाठी अदा करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यातील गुरांचे गोठे जळून शेती अवजारे व अन्य साहित्यांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(६४) * १०३२५१ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील ब्राम्हणवाडा थडी जालनापूर, राजोरा, करंजगाव, निमखेड, शर्यतपूर, जाधवपूर येथे माहे जानेवारी, २०१६ ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत शेतक-यांच्या गुरांचे गोठे जळून शेती अवजारे आणि अन्य साहित्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्यामुळे त्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याकरिता विभागीय आयुक्त, अमरावती यांनी शासन निर्णयात दुरुस्ती करण्याकरिता माहिती मागविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडे संबंधित चांदूरबाजार तहसील कार्यलयाकडून कोणती माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे,

(३) असल्यास, त्यानुसार गुरांचे गोठे जळून शेती अवजारे आणि अन्य साहित्यांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) "शासन निर्णयात दुरुस्ती करुन गुरांचे गोठे जळाल्यास ग्रामीण भागातील नागरिकांना विशेष बाब म्हणून आर्थिक मदत मिळणेबाबत" या विषयासंबंधीची माहिती विभागीय आयुक्त, अमरावती यांनी मागविली असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने तहसिलदार, चांदूरबाजार यांनी ०९ आपदग्रस्त व्यक्तींची माहिती सादर केली आहे.

(३) शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदीनुसार नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या व घराला जोडून असलेल्या गोठ्यास रु. २१०० प्रति गोठा, एवढी मदत अनुज्ञेय करण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयातील तरतूदींनुसार चांदूरबाजार तालुक्यातील ०९ आपदग्रस्त व्यक्तींपैकी २ व्यक्तींना रु.३१,८४२/- एवढी मदत देण्यात आली असून उर्वरित ७ व्यक्तींना विविध कारणास्तव मदत देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पार्डी (बु.) (ता.वसमत, जि.हिंगोली) या गावालगत अवैध उत्खनन करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत

**(६५) * १०३२८३ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पार्डी (बु.) (ता.वसमत, जि.हिंगोली) या गावालगतच्या खाणपटटा आराखडयात नसलेल्या गायरान जमिनीत वसमत ते अर्धापूर फाटा या राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वर काम करणाऱ्या ठेकेदाराने अवैध उत्खनन करून मुरूमाची वाहतूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध मुरूम वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनामुळे टोकाई ते गिरगाव हा रस्ता नादुरुस्त झाला असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित तहसिलदार यांच्याकडे तक्रार करूनही या ठेकेदारावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त ठिकाणी अवैध उत्खनन करून मुरूमाची वाहतूक करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करून अवैध उत्खननाच्या दंडाची वसूली करण्याबाबत तसेच टोकाई ते गिरगाव या रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) अवैध मुरुम वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे टोकाई ते गिरगाव हा रस्ता नादुरुस्त झाल्याचे व त्याबाबतची स्थानिक लोकप्रतिनिधींची अशी तक्रार तहसीलदार यांचेकडे प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) व (४) राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ च्या रुंदीकरणाच्या कामासाठी लागणाऱ्या ५०० ब्रास मुरुम या गौणखनिजाच्या उत्खननासाठी मौजे पार्डी, ता.वसमत येथील गट नं.२९१ मधून स्वामीत्वधनाची रक्कम शासनजमा करुन परवानगी देण्यात आली आहे. सदरहू क्षेत्र जिल्हा खाणकाम आराखड्यात समाविष्ट आहे.

पावसाळ्यात टोकाई ते गिरगाव या रस्त्यावर खड्डे पडल्याने सदरहू खड्डे भरण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांचेमार्फत प्रगती पथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोडबंदर, मिरे, महाजनवाडी व नवघर (जि.ठाणे) या ठिकाणी माती उत्खनन करून भराव टाकल्याबाबत

**(६६) * ९७६४७ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर, मिरे, महाजनवाडी व नवघर (जि.ठाणे) या ठिकाणी ९ विविध विकासकांनी शासनाची परवानगी न घेता माती उत्खनन करून भराव टाकल्या प्रकरणी तहसिलदार, ठाणे यांनी या ९ विकासकांविरोधात दंडात्मक कारवाई करुन दंड भरण्याबाबत नोटीसा बजावल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नोटीसांच्या अनुषंगाने संबंधित विकासकांनी दंडाची रक्कम न भरल्याने तहसिलदार, ठाणे यांनी संबंधीतांची संपत्ती जप्त करणे आवश्यक होते परंतु त्याप्रमाणे कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उपरोक्त ठिकाणी उत्खनन करून भराव टाकणाऱ्या ९ विकासकांविरूध्द कारवाई करून त्यांच्याकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) होय.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ चे कलम ४८ (७) नुसार दंडात्मक कार्यवाही करुन एकूण ९ विकासकांपैकी ७ विकासकांच्या मालकीच्या जमीनीच्या गाव नमुना नं.७/१२ उताऱ्यावर कब्जेदार सदरी "महाराष्ट्र शासन" अशी नोंद दाखल करण्यात आली आहे. एका विकासकाने त्यांना बजावण्यात आलेल्या दंडात्मक नोटीसीच्या अनुषंगाने केलेला खुलासा मान्य करण्यात आला असून त्यानुसार पुढील कार्यवाही तहसीलदार, ठाणे यांचेमार्फत सुरु आहे. तर अन्य एका प्रकरणामध्ये तहसीलदार, ठाणे यांचे दंडाबाबतचे आदेश अपीलामध्ये उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी रद्द केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे डोंगर पोखरून अवैध उत्खनन सुरु असल्याबाबत

**(६७) * १०१२६९ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हर्णे (ता.दापोली, जि. रत्नागिरी) येथे सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून व समुद्र किनाऱ्यालगतचे डोंगर पोखरून अवैध उत्खनन सुरु असल्याचे तसेच या उत्खननामुळे दगड मातीचे ढीग शेतात येऊन शेती करण्यास अडचण निर्माण होत असल्यामुळे या विरोधात शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असून तहसीलदार यांनी याकडे दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणची शेत जमीन बिनशेती दर्शवून व बनावट नकाशे तयार करुन विक्री करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त ठिकाणी डोंगर पोखरून अवैध उत्खनन करणाऱ्यांवर, शेत जमीन बिनशेती दर्शवून बनावट नकाशे तयार करणाऱ्यांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या तहसीलदारांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२), (३) व (४) मौजे हर्णे येथील सर्व्हे नं.८४ हिस्सा नं.५ व सर्व्हे नं.९० अ हिस्सा नं.८/२ या जमीनीस उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी दि.२४/११/२०१४ रोजीच्या आदेशान्वये निवासी प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी दिली असून याठिकाणी विकासकामे सुरु आहेत. तसेच मौजे हर्णे येथील सर्वे नं.हिस्सा नं.२८/५, २८/६, २८/९, २८/१०, २८/११, २८/ १३ व २८/१५ या जमिनीचे जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी रेखांकन मंजूर केले असून सदर जमिनीचे सपाटीकरण करुन बांधकामे करण्यात येत आहे. सदर ठिकाणाहून अन्य शेतजमिनीमध्ये माती वाहून गेल्याने शेतीसाठी अडथळा निर्माण झाल्याबाबतची कोणतीही तक्रार तहसीलदार, दापोली यांचेकडे प्राप्त झाली नाही. सदर ठिकाणाहून गौणखनिजाचे अवैध उत्खनन झाल्याचे आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रावेर (जि.जळगाव) तालुक्यात कपाशी पिकावर मर रोगाचा झालेला प्रादुर्भाव

**(६८) * १००८३२ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर (जि.जळगाव) मतदार संघात उत्तराच्या पावसाने पूर्वहंगामी बागायती कपाशीवर मर रोगाचा प्रादुर्भाव होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बागायती कपाशीवर मर रोगाचा प्रादुर्भाव होऊनही कृषी सहायकांनी काही नुकसान न झाल्याचा निर्वाळा दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बागायती कपाशीची पाहणी शासनाने केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार मर रोगाचा प्रादुर्भाव होऊन पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लामकानी (ता.जि.धुळे) येथील व आजूबाजूच्या परिसरातील कपाशीवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याबाबत

**(६९) * ९९४८२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लामकानी (ता.जि.धुळे) येथील व आजूबाजूच्या परिसरातील कपाशीवर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या परिसरातील कांदा, सोयाबीन, भुईमूग इ. पीकांचेही पावसाअभावी नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार येथील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी जुहू (मुंबई) येथील नामांकित हॉटेलने १९४७७ चौ. फुट शासकीय जागेचा गैरवापर केल्याबाबत

**(७०) * ९६२०३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी जुहू (मुंबई) येथील एका नामांकित हॉटेलने १९४७७ चौ. फुट शासकीय जागेचा गैरवापर केल्याने सदरची जागा तात्काळ ताब्यात घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास तहसीलदारांना दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हॉटेल वापरत असलेला भूखंड शासनाने १९४१ मध्ये एका संस्थेला दिला होता, परंतु सदर संस्थेने ती जागा हॉटेल कंपनीला विक्री केल्याने तसेच भूखंडाचे हस्तांतरण वेगवेगळ्या संस्थांना झाल्याने शासनाने कोट्यवधी रुपयाचा दंड आकारला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार भूखंड शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत तसेच संबंधित हॉटेल व भूखंडाचे हस्तांतरण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे जुहू, ता.अंधेरी येथील स.नं.७३ पैकी क्षेत्र २१६५ चौ.वार (१८१०.२ चौ.मी.) शासकीय जमीन दि.१५.३.१९४१ च्या कराराने श्री.किकाभाई प्रेमचंद ट्रस्टला ५० वर्षाच्या भाडेपट्ट्याने प्रदान करण्यात आली होती. त्यानंतर शासन पत्र दि.१५.१.१९५१ अन्वये सदर जागा मे.एअर इंडियाला पूर्वीच्याच अटी शर्तीवर हस्तांतरित करण्यात आली. तद्नंतर शासनाने सदर जमीन एअर इंडियाकडून काढून ती हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांना पूर्वीच्याच अटी शर्तीला अधीन राहून हस्तांतरणाला परवानगी दिली. शासन ज्ञापन दि.२७.१०.१९८३ अन्वये या जमीनीचा वापर फक्त खुली व बगीच्यासाठीच करण्याची परवानगी देण्यात येऊन सुधारित भाडेपट्टा करण्यात आला व हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून सन १९९० पर्यंत भाडेपट्ट्याची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तद्नंतर मे.हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांनी शासनाची पूर्वपरवानगी न घेता सदर जमीन मे.तुलीप हॉस्पीटीलिटी सर्व्हिसेस यांना हस्तांतरीत केली. त्यामुळे सदर कंपनीस अनर्जित रक्कम सुमारे रु. ४.४८ कोटी आणि त्यावरील व्याज सुमारे रु. ४.२१ कोटी अशी एकूण सुमारे रक्कम रु.८.६९ कोटीचा भरणा करण्याबाबतची नोटीस देण्यात आली आहे. सदर प्रकरणी अनर्जित उत्पन्नाची रक्कम मागणी नोटीस विरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

दरम्यान, याप्रकरणी संबंधित जागेचा वापर बगीचा या प्रयोजनासाठी न केल्याने झालेल्या शर्तभंगाबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी त्यांचे आदेश दि.३.१०.२०१७ अन्वये सदर जमीन शासन जमा करण्याबाबतचे आदेश पारित केले असून त्यानुसार तहसिलदार, अंधेरी यांनी दि.१३.१०.२०१७ रोजी सदर जमीन शासनाच्या ताब्यात घेतली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या आदेशाविरुध्द भाडेपट्टादार यांनी अपर आयुक्त, कोकण यांच्याकडे अपील दाखल केलेले आहे.

-----------------

## हिंगोली जिल्हयातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७१) * ९९८५७ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) शहरातील रस्त्यांची तसेच सेलसुरा ते माळधामणी, औंढा ते हिंगोली, नांदेड ते हिंगोली या महामार्गाची दुरवस्था झाली असल्यामुळे अपघात होऊन अनेक नागरिक जखमी होत असल्याचे तसेच या रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करुन तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्त्यांपैकी औंढा-हिंगोली रस्ता सा.बां.विभागाकडे, नांदेड-हिंगोली रस्ता केंद्र शासनाकडे व सेलसुरा-माळधामणी रस्ता जि.प. हिंगोली यांच्या अखत्यारित दुरुस्ती व देखभालीसाठी आहेत. या रस्त्याच्या डांबरीपृष्ठभागावर पडलेले खडडे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत आहेत. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे अपघात झाल्याची कोणतीही बाब नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टोरंट पॉवर कंपनीने म.रा.वि.महामंडळाच्या वितरण कंपनीशी केलेल्या कराराचे मुद्रांक शुल्क न भरल्याबाबत

**(७२) * ९७९४८ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहर व ग्रामीण भागात वीज वितरण व वीज बिल वसुलीसाठी शासनाकडून नियुक्त केलेल्या टोरंट पॉवर कंपनीने म.रा.वि.महामंडळाच्या वितरण कंपनीशी केलेला करार केवळ १०० रुपयांच्या स्टँप पेपरवर नोंदवून शासनाचा करोडो रुपयांचा मुद्रांक शुल्क बुडविला असल्याचे व या प्रकरणी राष्ट्रीय मानव हक्क मंच यांनी वारंवार केलेल्या तक्रारीनंतर उक्त कंपनीवर रुपये १ कोटी ८५ लाखांचा दंड मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ग्रामीण यांनी बसविला असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सह जिल्हानिबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ग्रामीण यांनी पत्र क्रमांक,जा.क्र./सजिनी/ठाणे(ग्रा)/चु.मु.शु./१७/११६६३-६४ व जा.क्र./सजिनी/ठाणे (ग्रा) /चु.मु.शु./१७/११६६१-६२/१७ नुसार उक्त कंपनीला १ कोटी ८५ लाख रुपये रकमेचा भरणा करणेबाबत आदेश दिले असतानाही कंपनीने अद्यापी सदर रकमेचा भरणा केला नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच उक्त करारात नमूद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या होत्या,

(४) असल्यास, चौकशीनुसार टोरंट पॉवर कंपनीकडून या करारापोटीचे मुद्रांक शुल्क वसूल करून कंपनीवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर करार कोणताही आक्षेप न घेता नोंदवून घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) भिवंडी शहर व ग्रामीण भागात विज वितरण व वीज बिल वसुलीसाठी म.रा.विद्युत वितरण कंपनीने मे. टोरंट पॉवर कंपनीशी दि.२०.१२.२००६ व दि.२६.०१.२०१७ रोजी अनुक्रमे रू. १००/- व

रू.५००/- च्या मुद्रांकावर करारनामे केले आहेत. उक्त कराराबाबत राष्ट्रीय मानव हक्क मंच यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांनी उक्त करारावर देय असलेले एकूण मुद्रांक शुल्क रूपये ८१ लाख ११ हजार १७० व त्यावरील दंड रूपये १ कोटी ६ लाख ३५ हजार ६५० असे एकूण रूपये १ कोटी ८७ लाख ४६ हजार ७२० इतके मुद्रांक शुल्क शासन खाती जमा करण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ३३ नुसार दि.०७.१०.२०१७ रोजी नोटीसा जारी केल्या आहेत. त्यानुषंगाने सदर प्रकरणी मे. टोरंट पावर कंपनीने त्यांचे म्हणणे सादर केले असून त्यांना सुनावणी देवून उक्त नमूद मुद्रांक शुल्क वसूल करण्याकामी पुढील उचित कार्यवाही मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांच्या स्तरावर सुरू आहे.

(३) उक्त करारातील प्रमुख बाबी खालीलप्रमाणे -

१. म.रा.विद्युत वितरण कंपनी व मे. टोरंट पॉवर कंपनी यांच्यात भिवंडी डिस्ट्रीब्युशन सर्कलमधील ७२१ चौ.कि.मी. क्षेत्रामधील वीज विक्री व पुरवठा करण्याचे प्रतिनिधी म्हणून अधिकार देण्याबाबत करार करण्यात आला आहे.

२. सदर करार १० वर्षाकरिता असून त्या करारामध्ये उभय पक्षकाराचे अधिकार व कर्तव्य नमूद आहेत.

(४) महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने मे. टोरंट पॉवर कंपनीशी केलेल्या उक्त कराराची नोंदणी ही नोंदणी अधिनियमाच्या तरतुदीनुसार वैकल्पिक असल्याने उक्त दस्त नोंदविण्यात आलेला नाही. तथापि, उक्त दस्तावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीनुसार मुद्रांक शुल्क देय असल्याने उक्त मुद्रांक शुल्क वसुलीची कार्यवाही मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांच्यास्तरावर सुरू आहे. त्यामुळे सदर करार कोणताही आक्षेप न घेता नोंदविला अशी वस्तुस्थिती नसल्याने कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे नायरी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील नायरी बौध्दवाडी-मराठवाडी या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

**(७३) * १०२२०९ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नायरी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील नायरी बौध्दवाडी-मराठवाडी या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत ग्रामस्थांकडून सातत्याने मागणी होत असून रस्त्याच्या दुरुस्तीबाबत नायरी (मराठवाडी) ग्रामविकास मंडळ, मुंबई यांच्यातर्फे मा.पालकमंत्री, रत्नागिरी यांच्याकडे दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१७ रोजी निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गाव डोंगराळ भागात वसले असून या ठिकाणच्या रस्त्याचे काम सन २००५ मध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झाले होते मात्र तद्नंतर दिनांक २४ एप्रिल, २०१२ रोजीच्या पत्रानुसार प्रश्नाधीन काम रोहयो विभागाने त्यांच्या योजनेतून वगळून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांना पूर्ण करण्याबाबत कळविले असतांनासुध्दा अद्यापी सदर काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे तीन कि.मी. च्या या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी विभागाने निधीची तरतूदच केलेली नसून पक्का रस्ता नसल्यामुळे या परिसरातील ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना या रस्त्यावरुन ये-जा करणे अडचणीचे ठरत असल्याचे तसेच रस्त्यावरुन वाहने जाण्याची सोय नसल्याने रुग्णांना लाकडी बांबूला डोली बांधून न्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून या रस्त्याचे खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

अशा प्रकारचे निवेदन ग्राम विकास विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) होय, हे खरे आहे.

सदरचे काम सन २००५ मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर झाले होते. तथापि, दि.१.४.२००८ पासून नवीन महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु झाल्यामुळे जूनी रोजगार हमी योजना बंद करण्यात आली. त्यामुळे जून्या योजनेतील कामांचा आढावा घेऊन, सदर कामे इतर योजनेतून पूर्ण करावी असे सूचित करुन, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी त्यांचे पत्र क्र.रोहयो-१/कामे वगळणे/०६/२०११, दि.२०.७.२०११ अन्वये वगळण्यात आली. त्या अनुषंगाने सदर काम जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत करण्यासाठी वर्ग करण्यात आले. तथापि, सदर कामास अद्यापपर्यंत जिल्हा वार्षिक योजनेतून मान्यता प्राप्त झालेली नाही.

(३) होय.

(४) व (५) प्र.जि.मा. ४७ हे नायरी बौध्दवाडी-मराठवाडी रस्ता ग्रामीण मार्ग १३८ च्या कि.मी. ०/०० ते ०/४०० मध्ये डांबरी पृष्ठभागापैकी १५० मीटर कारपेट सीलकोट करण्यासाठी रक्कम रु.३.०० लक्ष, कि.मी. ०/४०० ते १/०० मध्ये खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण, कारपेट सीलकोट करण्यासाठी रक्कम रु.१२.०० लक्ष व कि.मी. १/५०० ते २/५०० मध्ये मातीकाम करणे, खडीकरण, मजबुतीकरण व डांबरीकरण, कारपेट सीलकोट करण्यासाठी रक्कम रु.२४.०० लक्ष अशी एकत्रित एकूण रु.३९.०० लक्ष इतका निधी आवश्यक आहे.

जिल्हा परिषदेकडे विविध योजनांतर्गतच्या निधी उपलब्धतेनुसार व निकषानुसार सदर रस्त्यांचे काम टप्प्या-टप्प्याने घेण्याचा जिल्हा परिषेचा प्रयत्न आहे.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.